१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, सोमवार ११ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-५५, पाने-८, किंमत : ₹ ६

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 55, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 11 November, 2024 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## युके पंतप्रधानांची दिवाळीची पार्टी नॉनव्हेज, मद्यामुळे वादात



**लंडन -** युकेचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी २९ ऑक्टोबर रोजी आपल्या १० डाऊनिंग स्ट्रीट या निवासस्थानी दिवाळी पार्टीचे आयोजन केले होते. या दिवाळी पार्टीच्या मेन्यूमध्ये मांसाहारी पदार्थ आणि मद्य असल्याने ब्रिटनमधील हिंदूंनी नाराजी व्यक्त केली आहे. या पार्टीला गेलेल्या पाहुण्यांना मांसाहारी पदार्थ आणि मद्य पाहून धक्का बसल्याचे काहींनी सांगितले आहे. 'इनसाईट युके' या ग्रुपने असा प्रश्न विचारला आहे की, पार्टीच्या आयोजकांनी पार्टीचा मेन्यू ठरविताना धार्मिक नेत्यांशी बोलणे केले होते का? दिवाळी सणाची महती न जाणून घेता हा मेनू ठरविला होता, असे यावरून दिसते.

# लाडक्या बहिणींना २१०० रुपये शेतकऱ्यांसाठी भावांतर व कर्जमाफी

## भाजपाच्या संकल्पपत्रातून आश्वासन




**भाजपाने आज महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा प्रकाशित केला. लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये, शेतकऱ्यांना किमान हमीभाव मिळावा यासाठी भावांतर योजना व कर्जमाफी अशी २५ आश्वासने संकल्पपत्रात दिली आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटले की भाजपाचे संकल्पपत्र तर काँग्रेसचे स्थगितीपत्र आहे.भाजपाने त्यांचे संकल्पपत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रकाशित केले. यावेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.**

■ मुंबई

**भाजपाच्या** संकल्पपत्रात लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याला रु. १५०० वरुन रु. २१०० देण्यात येतील, महिला सुरक्षेसाठी २५००० महिलांचा पोलीस दलात समावेश करण्यात येईल, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला रु. १२,००० वरून रु. १५,००० दिले जातील, एमएसपीशी समन्वय साधत २० टक्क्यांपर्यंत भावांतर योजना राबविण्यात येईल, प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा, वृद्ध पेन्शन धारकांना महिन्याला रु. १५०० ऐवजी रु. २१०० देण्यात येतील, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवणार, आगामी काळात २५ लाख रोजगार निर्मिती , महिन्याला १० लाख विद्यार्थ्यांना रु. १०,००० विद्यावेतन देण्यात येईल, १० राज्यातील ग्रामीण भागात ४५,००० गावांत पांधण रस्ते बांधण्यात येतील, अंगणवाडी आणि आशा सेविकांना महिन्याला रु१५,००० वेतन आणि विमा संरक्षण देण्यात येईल, वीज बिलात ३०% कपात करुन सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्यात येईल अशी आश्वासने देण्यात आली.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मविआ आणि राहुल गांधी यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, आघाडीचा सर्व योजना सत्तेच्या लालसेपोटी आहेत. मला उद्धव ठाकरे यांना विचारायचे आहे की, ते काँग्रेस नेते राहुल गांधी यांना वीर सावरकर यांच्याबद्दल दोन शब्द बोलायला सांगू शकतात का? बाळासाहेब ठाकरे यांच्या सन्मानार्थ काँग्रेसचा कोणीही नेता दोन वाक्य बोलू शकतो का? अंतर्गत विरोधादरम्यान आघाडीचे जे लोक सरकार स्थापन करण्याचे स्वप्न घेऊन निघाले आहेत. त्या लोकांना महाराष्ट्रातील जनतेने ओळखले तर बरे होईल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर आणण्याचे आमचे धोरण आहे. महाराष्ट्र फिनटेक आणि एआयचे हब होईल. या क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत.




## थोडक्यात...

### सोलापूरमध्ये काँग्रेसचे पाच माजी नगरसेवक भाजपात

**सोलापूर -** जिल्ह्यात भाजपाने काँग्रेसला धक्का दिला आहे. चर्मकार समाजातील काँग्रेसच्या पाच माजी नगरसेवकांनी भाजपामध्ये प्रवेश केला. त्यात माजी युवक अध्यक्ष अंबादास करगुळे, माजी नगरसेवक सिद्राम अटेलूर, माजी नगरसेवक जेम्स जंगम, माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे, माजी नगरसेविका सरस्वती कासलोलकर, नागनाथ कासलोलकर यांचा समावेश आहे. सोलापूर शहर मध्य या मतदारसंघात चर्मकार समाजाला उमेदवारी न दिल्याने त्यांनी भाजपात प्रवेश केला असल्याची माहिती आहे. औरंगाबाद येथे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

### अजित पवार यांची पुरंदरमधील सभा रद्द

**पुरंदर -** उपमुख्यमंत्री अजित पवारांची आज पुरंदरमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार संभाजी झेंडे यांच्या प्रचारार्थ सभा आयोजित केली होती. पण ती सभा काही कारणामुळे रद्द झाली. त्यानंतर अजित पवार मुंबईसाठी रवाना झाले. सभा रद्द झाल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पुरंदर हवेली मतदारसंघातून विजय शिवतारे यांना शिवसेना शिंदे गटाने उमेदवारी दिली आहे. तर अजित पवारांनी संभाजी झेंडे यांना निवडणुकीत उतरवले आहे. दोन्ही उमेदवार आपापल्या पक्षाच्या एबी फॉर्मवर विधानसभा निवडणूक लढणार आहेत. यामुळे शिवसेनेचे शिवतारे व राष्ट्रवादीचे झेंडे अशी महायुतीतच लढत होणार आहे.

### आता भारतातही होणार 'हायस्पीड ट्रेन'ची चाचणी

**मुंबई -** आता भारतातही 'हायस्पीड ट्रेन' ची चाचणी होणार आहे. त्यासाठी राजस्थानमध्ये देशातील पहिला ट्रेन ट्रायल ट्रॅक जवळपास तयार झाला आहे. हा एक समर्पित रेल्वे चाचणी ट्रॅक असणार आहे. हा ट्रॅक डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण होईल. भारतातील हा पहिला समर्पित रेल्वे ट्रायल ट्रॅक ६० किमी लांबीचा आहे. हा ट्रॅक सरळ नसून अनेक भागात वळणावळणाचा तयार करण्यात आला आहे. याद्वारे वेगात येणारी ट्रेन वेग कमी न करता वळणावळणाच्या रुळावरून कशी जाईल याची चाचणी घेता येईल. या वक्रांमध्ये काही वक्र कमी वेगासाठी बनवले जातात आणि काही उच्च गतीसाठी बनवले जातील.

### विक्रोळीत व्हॅनमधून करोडोच्या चांदीच्या विटा जप्त

**मुंबई -** विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत काही दिवसांपासून राज्यातील विविध ठिकाणी पोलिसांनी लाखो रुपयांची रोकड जप्त केली. त्यातच आज विक्रोळीत एका व्हॅनमध्ये साडेसहा टन चांदीच्या विटा सापडल्या. या चांदीच्या विटांची किंमत कोट्यवधी रुपये आहे. या प्रकरणी आता निवडणूक आयोग, आयकर विभाग, पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. राज्यात आचारसंहितेची अंमलबजावणी सुरू असून नाकेबंदीदरम्यान अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात रोकड, दारू, सोने-चांदी जप्त करण्यात आली आहे.

## मविआच्या 'महाराष्ट्रनाम्या'त वचनांचा पाऊस ५०० रुपयांत ६ सिलिंडर! १०० युनिट वीज मोफत

■ मुंबई

**काही** दिवसांपूर्वी आश्वासनांची पंचसूत्री जाहीर केल्यानंतर महाविकास आघाडीच्या 'महाराष्ट्रनामा' या सविस्तर जाहिरनाम्याचे आज प्रकाशन झाले. ४८ पानांच्या या जाहीरनाम्यात मतदारांवर आश्वासनांचा अक्षरशः वर्षाव करण्यात आला आहे. त्यात महिलांना वर्षाला ६ सिलिंडर, ३०० युनिटपर्यंत वीजवापर असणाऱ्या ग्राहकांना १०० युनिट मोफत वीज, प्रत्येक कुटुंबाला तीन लाखाची आर्थिक मदत, प्रत्येक मुलीच्या नावे बँक खात्यात १८ वर्षांनंतर १ लाखाची रक्कम, सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना, अडीच लाख सरकारी पदांची भरती, महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीसाठी २ दिवसांची ऐच्छिक रजा, सरकारी रुग्णालयात मोफत औषधे, महाराष्ट्रात जातीनिहाय जनगणना यांचा समावेश आहे. महायुतीला टक्कर देण्यासाठी मविआने सर्वात भरगच्च असा हा जाहीरनामा जाहीर केला आहे. मुंबईतील नरिमन पाईंट येथील हॉटेल ट्रायडंटमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांच्या उपस्थितीत हा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस




» पान ७ वर

## कन्नमवार नगरमध्ये पुनर्विकास रखडला उच्च न्यायालयात याचिका! आज सुनावणी

■ मुंबई

**मुंबईच्या** विक्रोळीतील कन्नमवार नगर येथील म्हाडाच्या जागेवरील इमारती जीर्ण झाल्याने तिथल्या रहिवाशांना त्याचा पुनर्विकास करायचा आहे. मात्र सीआरझेड कायदा आणि बफर झोनमुळे हा पुनर्विकास रखडला आहे. त्यामुळे येथील रहिवाशांनी या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून तिची सुनावणी उद्या होणार आहे. या आधीच्या सुनावणीत न्यायालयाने महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी



(एमसीझेडएमए) आणि म्हाडाला प्रतिज्ञापत्रावर भूमिका स्पष्ट करण्यास सांगितली होती.

कन्नमवार वसाहतीतील १५७, १५८, १५९, १६४, १६८, १६९ आणि १७० या इमारतींची दुरवस्था झाली आहेत. या इमारती १९६५ ते १९७० मध्ये म्हाडाने बांधलेल्या असून बहुतांश इमारतींचे अभिहस्तांतरण (कन्व्हेयन्स) झालेले आहे. म्हाडानेच रहिवाशांना पायाभूत सेवा सोयी पुरवल्या आहेत. या इमारती जीर्ण झाल्या आहेत. त्यांची दुरुस्ती हा उपयुक्त पर्याय नसल्यामुळे त्यांचा पुनर्विकास करणे आवश्यक आहे. मात्र सीआरझेड कायदा आणि कांदळवन

» पान ७ वर

## कामगारांच्या कमतरतेमुळे राममंदिर पूर्ण होण्यास तीन महिने विलंब

■ अयोध्या

**अयोध्येतील** राममंदिरात रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली असली तरी अयोध्येतील राममंदिराचे काम पूर्ण झाले नसून या मंदिराच्या पूर्णत्वासाठी आणखी तीन महिन्यांचा विलंब होणार आहे. या मंदिराचे काम पुढच्या वर्षी जूनमध्ये पूर्ण होणार होते ते आता सप्टेंबरमध्ये होणार आहे. राममंदिराच्या बांधकामासाठी मजूरांच्या कमतरतेमुळे हा विलंब होणार आहे. याआधीच्या राममंदिराच्या बांधणीत राहिलेले दोष दुरुस्त



करण्यासाठीही वेळ लागणार आहे. असे राममंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष न्रिपेंद्र मिश्रा यांनी सांगितले आहे.

राममंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष न्रिपेंद्र मिश्रा यांनी म्हटले की, सध्या राममंदिराच्या बांधकामासाठी २०० मजूरांची कमतरता आहे. या मंदिरातील पहिल्या मजल्यावरील काही फरशा बदलाव्या लागणार आहेत. त्यामुळेही बांधकामाला विलंब होत आहे. राम मंदिराच्या कुंपणासाठी साडेआठ लाख वर्ग फूट बांसी पहारपूर हा दगड

» पान ७ वर

## जम्मू-काश्मीरमधील चकमकीत एक जवान शहीद! तीन जखमी

■ श्रीनगर

**जम्मू** काश्मीरच्या किश्तवाड जिल्हयातील एका जंगलात दहशतवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत सब इन्स्पेक्टर राकेश कुमार हे शहीद झाले असून इतर तीन जवान जखमी झाले आहेत.

किश्तवाड जिल्ह्यातील केशवान, चास व कोतवाडा येथील जंगलात काही दहशतवादी लपले असल्याची माहिती मिळाल्यानंतर लष्कराने या ठिकाणी कारवाई केली. यावेळी झालेल्या चकमकीत दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात लष्कराचे तीन जवान जखमी झाले. जखमी सैनिकांना उधमपूर येथे दाखल करण्यात आले आहे. यातील राकेश कुमार हे शहीद झाले असून दुपारी आणखी एक जवान जखमी झाला आहे.

## सत्तेसाठी काँग्रेसचे जातींचे राजकारण झारखंडमध्ये नरेंद्र मोदी यांची टीका

■ बोकारो



**झारखंड** विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी बोकारोमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जाहीर सभा घेतली. काँग्रेस अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गातील लोकांना तोडत त्यांचे छोट्या-छोट्या जातींमध्ये विभाजन करत आहे. देशाला स्वतंत्र झाल्यापासून सत्तास्थापनेसाठी काँग्रेस समाजाची अशी विभागणी करून फायदा घेत असल्याचा आरोप मोदी यांनी या जाहीर सभेत केला.

नरेंद्र मोदी यांनी पुढे सांगितले की, देशाच्या स्वातंत्र्यानंतर एससी, एसटी आणि ओबीसी समाज विभक्त राहिला. तेव्हा काँग्रेसने फोडा आणि राज्य करा, या सिद्धांतावर केंद्रात सत्ता मिळवली. १९९० मध्ये ओबीसींना आरक्षण मिळाले तेव्हा यात इतर जाती समाविष्ट झाल्या. त्यानंतर काँग्रेस लोकसभेत २५० जागा जिंकू शकली नाही. त्यामुळे काँग्रेस ओबीसीची ताकद तोडण्याचा प्रयत्न करत आहे. या जातींना विभागण्याचा प्रयत्न करत आहे. झारखंडमध्ये १२५ हून अधिक ओबीसी जाती आहेत. या सर्व ओबीसी म्हणून ओळखल्या जातात.

## खा.महाडीकांचे वादग्रस्त वक्तव्य निवडणूक आयोगाची नोटीस

■ मुंबई

**लाडकी** बहीण योजनेवरून भाजपा खासदार धनंजय महाडीक यांनी काल आपले पुत्र कोल्हापूर दक्षिणचे महायुतीचे उमेदवार अमल महाडीक यांच्या प्रचारसभेत महिलांबाबत वादग्रस्त विधान केले होते. महाडीक म्हणाले होते की, लाडकी बहीण योजनेचे पैसे घेणाऱ्या महिला जर काँग्रेसच्या रॅलीत, सभेत दिसल्या तर त्यांचे फोटो काढून आम्हाला द्या. आम्ही त्यांची व्यवस्था करतो. याप्रकरणी महाडीक यांच्यावर टीका होताच त्यांनी महिलांची जाहीर माफी मागितली होती. परंतु आता निवडणूक आयोगानेही खासदार महाडीक यांना नोटीस पाठवली आहे. कोल्हापूर दक्षिण निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ही नोटीस जारी केली आहे.

## कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडीयुरुप्पांवर कोविड भ्रष्टाचार प्रकरणी खटल्याची शिफारस

**कर्नाटकात भाजपा सरकारच्या काळात कोविड साहित्य खरेदीत झालेल्या भ्रष्टाचारप्रकरणी माजी मुख्यमंत्री बी.एस. येडीयुरुप्पा यांच्यावर खटला चालवण्याची शिफारस करण्यात आली आहे. ५ ऑगस्ट २०२३ रोजी न्यायमूर्ती जॉन मायकेल डिकुन्हा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ही शिफारस केली आहे.**

■ बंगळुरु

**कर्नाटकात** कोविड काळात भाजपाचे सरकार होते.



या सरकारने केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती डिकुन्हा समिती नेमण्यात आली. डिकुन्हा यांनी आपला ११ खंडांचा अंतरिम अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. या अहवालात माजी मुख्यमंत्री येडीयुरुप्पा व माजी आरोग्य मंत्री आर. श्रीमालू यांच्यावर खटला चालवण्याची शिफारस करण्यात आली आहे. कोविड काळातील खरेदीमध्ये ७ हजार २२३ कोटी ६४

» पान ७ वर

## सरकार बदलल्याशिवाय म्हातारा होणार नाही! शरद पवारांचे वक्तव्य

■ उस्मानाबाद

**हे सरकार** बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही. शांत बसणार नाही, असे वक्तव्य शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. परांडा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत शरद पवार बोलत होते. यावेळी खासदार ओमराजे निंबाळकर, रणजित पाटील उपस्थित होते. त्यावेळी ओमराजेंनी शरद पवारांना तुम्ही या वयातही हिंडत आहात असे म्हटले. त्यावर सभेला संबोधित करताना शरद पवार म्हणाले ओमराजे माझ्या तब्येतीबाबत विचारत होते. या वयातही तुम्ही हिंडत आहात असे विचारले. मी म्हणतो मी काय म्हातारा झालो आहे का? या महायुतीच्या लोकांना घरी बसवल्याशिवाय मी गप्प बसणार नाही. हे सरकार बदलल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. तुमच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जोपर्यंत आमचे सरकार येत नाही तोपर्यंत मी म्हाताराही होणार नाही. ते पुढे म्हणाले की, काही

» पान ७ वर

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरी मध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग करण्यासाठी मुली पाहिजे. दहिसर पूर्व - Contact: **8169999128** {NC243005}

इमिटेशन पॅकिंग कामासाठी मुली पाहिजेत. पगार 9500/- वयोमर्यादा 30 वर्षे, कामाची वेळ 9 ते 6.30 भद्रेशभाऊ प्रिन्सेस, रतन टेरेस कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड (वेस्ट) स्टेशन समोर. 11, स्वस्तिक इंडस्ट्रीज, कामगार स्टेडियमसमोर, सेनापती बापट मार्ग, दादर (वेस्ट), फोन : **8356983848** {NC243026}

लोअर परेल, मुंबई, प्रिंटिंग प्रेसमध्ये पंचिंग ऑपरेटर पाहिजे. **9320614083 / 9320307848** {NC243027}

घरकामासाठी महिला-मुली/मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC243059}

गोरेगाव (प)- युनिफार्म फॅक्टरी मध्ये - फील्ड सेल्समेन (२-४ व्हीलर ड्रायव्हर) प्रोडक्शन मॅनेजर, मर्केंडाइजर, मास्टर, सिलाई कामगार, प्रेसमेन, लाइनमास्टर, क्वॉलिटी चेकर, मशीन ऑपरेटर (मुंड्डा, इलास्टिक, बारटेक, ओवरलॉक, फाइवथ्रेड, काज बटन) गोपेश युनिफॉर्म्स. **8169706810** {NC243063}

लॅमिनेशनसाठी ऑपरेटर पाहिजेत. **9819177248 /9820911021** {NCC240077}

पंचीग मशीन ऑपरेटर आणि हेडलबर्ग 20x28 संपुर्ण टीम (प्रिंटर, बॉयलर, फीडरमन) पाहिजेत. भांडुप (वेस्ट) : **9867316567**. {NC243061}

5/2 कलर फिडरमन, बॉयलर, Tally ऑपरेटर, ऑफिसबॉय पाहिजेत. लोअरपरेल - **9833552423** {NC243047}

स्विमिंगपुल बनवण्यासाठी मुंबई, ठाणे येथे अनुभवी प्लम्बर पाहिजेत पगार 20000 ते 35000 इंटरव्यूसाठी कॉल - **9892510002** {NC242978}

## पाहिजेत

चुनाभट्टीमध्ये हाऊसकिपिंगसाठी मुले पाहिजेत. आकर्षक पगार दीपक - **9820060732 - मंगेश 7045908864** {NC243098}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट, - **7021374861** {NC242976}

अंधेरी ईस्टमध्ये कुरियर कंपनीसाठी पिकअप बॉय पाहिजेत. ऑशियानेट लॉजिस्टिक - **8169050216** {NC242987}

दादर, P Square Pest Control मुले/मुली पाहिजेत. **9820548338/ 9167952766** {NC243052}

**पाहिजेत**
**घाटकोपर आणि भिवंडीसाठी फॅक्टरी असिस्टंट आणि अकाऊंटन्ट असिस्टंट पाहिजे. टेली सॉफ्टवेअरचा अनुभव आवश्यक.**
**बाहुबली प्रिंटर्स**
ए -28, घाटकोपर इंडस्ट्रियल इस्टेट, अमृत नगर, घाटकोपर (प) मुंबई - 400086
Contact - 9930155496/7977185551

नामांकित पेस्टकंट्रोल कंपनीला फवारणीसाठी अनुभवी मुले पाहिजेत. 108, अपोलो चेंबर, मोगरा लेन, अंधेरी (पू.), **9833110154** {NC243007}

कल्याण (कोनगाव) येथील नवीन प्रिंटिंग प्रेसमध्ये आवश्यकता आहे १) प्रॉडक्शन सुपरवायझर २) ऑफसेट प्रिंटर (हेडलबर्ग) आणि बॉयलर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर ५) हेल्पर ६) पॅकिंगसाठी कॉन्ट्रॅक्टर. त्वरीत संपर्क करा. **9821434502 / 9870618007** {NC242995}

अर्जंट पाहिजेत. सिक्युरिटी गार्ड पगार 22,000/- - 18,500/-, 15,000/-, 12,000/- हाऊसकिपिंग - 14,000/- भेटा : शॉप नं. 5, हरिविजय अपार्टमेंट, शिंपोली रोड, बोरीवली (वे), **9930839380 / 8169353836** {NC243021}

## पाहिजेत

पॅकिंगसाठी मुली पाहिजेत. पगार + प्रवासखर्च कुर्ला पश्चिम. संपर्क - **9326832523** {NC243100}

SM-74 मशीनसाठी ऑफसेट प्रिंटर आणि टीम आवश्यक आहे. लोअरपरळ येथे संपर्क - **7506716688 / 7506716689** {NC243037}

मालाडमध्ये पॅकिंग/हेल्पर कामासाठी मुले/मुली पाहिजे. **9588747474 / 9769694799** {NC243032}

ऑफिस कामासाठी प्यून पाहिजेत. भेटा : ऑफिस नं. 5, ग्राऊंड फ्लोअर प्रेस्टिज इंडस्ट्रीयल इस्टेट, बावडी लेन, ऑफ मार्वे रोड, HDFC बँकेच्यामागे, मालाड (वेस्ट), **9320214161** (जवळ राहणाऱ्यांना प्रथम प्राधान्य) {NC243070}

मालाडमध्ये फक्त फायर एक्सटिंग्युशर डिलिव्हरीच्या कामासाठी डिलिव्हरी बॉय पाहिजेत. भेटा : ऑफिस नं. 5, ग्राऊंड फ्लोअर प्रेस्टिज इंडस्ट्रीयल इस्टेट, बावडी लेन, ऑफ मार्वे रोड, HDFC बँकेच्यामागे, मालाड (वेस्ट), **9320214161** (बोरिवली, कांदिवली, मालाड राहणाऱ्यांना प्रथम प्राधान्य) वयमर्यादा - 40 पर्यंत {NC243071}

सिक्युरिटी गार्ड, हाऊसकिपिंग / सुपरवायझर, एरिया ऑफिसर, जेन्टस, लेडीज, पेंट्रीबॉय, इलेक्ट्रिशन प्लंबर, MST. वरळी, दादर, भायखळा, गोवंडी, माटुंगा, जोगेश्वरी, बोरीवली **8291056761 / 8422880513** {NC243074}

बोरीवलीमध्ये हाऊसकिपिंगच्या कामासाठी अनुभवी मुले पाहिजेत. जेवणाची सोय. **9892192141** {NC243083}

मुलुंडयेथे अज्जुबाबा Fast Food साठी हाऊसकीपिंगसाठी मुले आणि डोसा, पाणीपुरी कारीगर, काऊंटर स्टाफ पाहिजेत. **9920563855 / 8104614956.** {NC243092}

संपूर्ण मुंबईमध्ये सुरक्षा गार्डसाठी पुरुष, महिला अर्जंट पाहिजेत. पगार 21500-28500 अंधेरी (ईस्ट), **9819544186** {NC242986}

फ्री जॉब ! सुमित सेफ सिक्युरीटी प्रा. लि. सिक्युरीटीगार्ड , सुपरवायझर्स पाहिजेत. राहण्याची सोय. (मुलुंड - **9930064005 / 9223290004 / 9769037229**) / (ठाणे - **9223290006 / 8369385552 / 9372264341**) / (वेस्टर्न - **9769758542 / 9223293555**) / (पुणे - **9223290222 / 9930064008**) /(नागपुर - **9223292777 / 9082030524**) / (गुजरात - **7574064574 / 9324515759**). {NC243090}

कला क्रिएशन : इमीटेशन कामासाठी मुले/मुली पाहिजेत. भेटा : आदित्य प्लाझा, पहिला माळा, F-9, दादीशेठ लेन, मालाड (वेस्ट), **9518368079** {NC243084}

## पाहिजेत

डिलिव्हरी बॉयज पाहिजेत. पगार + प्रवास खर्च कुर्ला पश्चिम. संपर्क - **9326832523** {NC243099}

इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक टेक्निशियन, हेल्पर, अलार्म सीसीटीव्ही कामासाठी अनुभवी /बिनाअनुभवी मुंबईतील कंपनीकरिता हुशार प्रामाणिक मुलगा पाहिजे. **9820250168** {NC243105}

लोअरपरेल येथे रोज 500 रुपये डेली वेजेसवर बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू, मेहनती युवक पाहिजेत. वय 40 पर्यंत काम 9 ते 6 (प्रत्येक बुधवारी पगार, गाडी भाडे, इन्शुरन्स, युनिफॉर्म ओव्हरटाईम वेगळे) संपर्क : **9821819036, 9320080200** {NC242988}

हेल्थकेअर कंपनीमध्ये हेल्पर, पॅकिंगसाठी महिला आणि पुरुष, मुली आणि मुले पाहिजे शिक्षण वयाची अट नाही संपर्क:- **7738372055/ 7506121314 SALARY 19900**{NC243051}

मालाड मध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत प. 15000/- **7208713536.** {NC242977}

मुंबई-गोवा हायवे हॉटेलसाठी त्वरित इंडियन/पंजाबी कुक आणि वेटर पाहिजेत. (राहणे-जेवणाची सोय) **9860778153, 8169184845, 9511829844** {NC243013}

**सुप्रसिध्द ऑफसेट प्रिंटिंग प्रेसमध्ये त्वरीत पाहिजेत 4 कलर कोमोरी 28x40( ऑटो प्लेट ):**
प्रिंटर, फीडरमॅन, बॉयलर, सायपा कटिंग मशीन ऑपरेटर, फोल्डिंग मशीन ऑपरेटर, लॅमिनेशन मशीन ऑपरेटर, पंचिंग मशीन ऑपरेटर, अनुभवी अकाऊंटंट, हेल्पर, डिलिव्हरी बॉईज.
सुविधा– **ESIC,PF,BONUS, TRAVELLING**
पत्ता: प्लॉट नं. २३ ते २६, भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क, नाशिक हायवे रोड जवळ, भिवंडी
**9769706594**

प्रिंटिंग प्रेससाठी पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, फिडरमन पाहिजेत. संपर्क : **9930589715 / 9820930362** {NC243014}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम / पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा - दुपारी 11 ते 9 स्पिडलिंक कुरीयर शॉप नं 3 आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉसरोड अंधेरी पूर्व {NC243011}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुले / मुली पाहिजेत. (मालाड वेस्ट) - **8450931541** {NC242982}

हेडलबर्ग दोन कलर प्रिंटिंगसाठी प्रिंटर पाहिजे. जरीमरी, कुर्ला अंधेरी रोड **9821036458** {NC243062}

ठाण्यातील नामवंत कंपनीला स्क्रीन प्रिंटिंगसाठी ३वर्षे अनुभवी प्रिंटर आणि हेल्पर पाहिजे संपर्क: मो.नं. **9821385744.** {NC243056}

## पाहिजेत

पेस्ट कंट्रोल कंपनी मुंबई , ठाणे, डोंबिवली, करिता ऑपरेटर पाहिजे. बाईक आणणाऱ्याला प्राधान्य : **9323682041** आकर्षक वेतन {NC243089}

**पॉवरजेट इंजीनियरिंग एलएलपी**
वसई ईस्ट
**पाहिजेत**
१. वेल्डर
२. हेल्पर
३. डिप्लोमा/डिग्री इंजीनियर (मैकेनिकल / प्रोडक्शन/ इलेक्ट्रिकल)
संपर्क : **9967003046**
ई-मेल: info@powerjetengineering.com admin@powerjetengineering.com

प्रिंटींग प्रेसमध्ये हेडलबर्ग मशीनसाठी फिडरमन आणि बॉयलर पाहिजेत. महापे, नवीमुंबई. **9820614018** {NC243058}

त्वरित सिक्युरिटी गार्ड पाहिजे. पगार 20000/- (PF, ESIC ची सुविधा) मोबाईल - **8879977253 / 8879977250** {NC243075}

मुंबई, ठाणेमध्ये घरी पेशंट सांभाळण्यासाठी आया, नर्से स वॉर्डबॉयची गरज आहे. - **9136792832, 8291152695** {NC243076}

भिवंडी ठाणे येथील नामांकित प्रिंटिंग प्रेससाठी हेडलबर्ग 72V प्रिंटिंग मशीन फिल्डरमॅन व बॉयलर सिलेंडर फॉइलिंग मशीनसाठी ऑपरेटर सिलेंडर पंचिंग मशिनसाठी ऑपरेटर कळवा रेल्वे स्टेशन पासून जाण्या येण्यासाठी सोय. संपर्क - **8766408439** {NC243107}

सुकुटुंबात 24 तास घरकामासाठी (वय 18-30) मुली/बायका पाहिजेत. पगार 15000/- पनवेल **09867104691** {NC243111}

हेडलबर्ग ऑफसेट मशीनवर माणसं पाहीजेत . कोटियन प्रिंटिंग प्रेस - गोरेगाव (ईस्ट). **9820039302 / 02240039795.** {NC243116}

महिला मुली मदतनीस काऊंटरवर कॅशियर्स सुपरवायझर्स कार ड्रायव्हर्स दोन पाळ्यात 15000 - 25000 **8657438844 / 9076103969** {NC243113}

नामांकित कुरियर कंपनीला घाटकोपर आणि चेंबूरसाठी पार्टटाईम डिलिव्हरी बॉय पाहिजेत. संपर्क करा. 11.30 नंतर **9769999189** {NC243119}

गोरेगाव प्रिंटिंग कंपनीमध्ये मेल हेल्पर पाहिजे आणि टॅली ऑपरेटर अंधेरी ऑफिसमध्ये पाहिजेत. **9833686138** {NC243125}

## पाहिजेत

कांदिवली महावीर नगर (पश्चिम) साठी सुरक्षा रक्षक पाहिजेत. ड्युटी 12 तास, पगार 12500/-. मिळण्याचे ठिकाण 10th मॉल, मीटिंगची वेळ सकाळी 08 ते 10 आणि संध्याकाळी 06 ते 08:30 वाजता. कॉल : **9768785795 / 7028374768** किशोर झा. {NC243117}

मशीन-कोमोरी/हेडलबर्ग फोर कलर ऑटो प्लेट प्रिंटिंग प्रेससाठी प्रिंटर, फिडर मॅन, बॉयलर, मॅन्युअल पंचिंग मशीन ऑपरेटर पाहिजेत. पत्ता :- First Impression, युनिट नं. 16/17 J.K. इंडस्ट्रियल, निअर पेपर बॉक्स, अंधेरी ईस्ट मुंबई - 400093. संपर्क : **8928498961 / 9821094307** {NC243114}

बोरीवली पूर्वमध्ये इमिटेशन ज्वेलरीच्या कंपनीत डायमंड चिटकवायला मुली पाहिजेत. पगार योग्यतेनुसार वय 35 पर्यंत संपर्क : कार्टररोड-2, शताब्दी हॉस्पिटलजवळ स्टेशनपासून 5 मिनिटांवर, बोरिवली (पूर्व) **7977369456** (वेळ - 9.00-6.00) {NC243122}

ऑफसेट मशीन ऑपरेटर फिडरमेन, हेडलबर्ग 72 V मशीनसाठी बोईलर पाहिजेत. भिवंडी (मनखोली - **9324903743 - 9867946135** {NC243123}

## Situation Vacant

Required 1) Tele calling executive (female) Product: fire extinguishers (Own service) (salary + conveyance) Yesbee Fire Services, Vakola, Santacruz (E) Call - **7666866221.** {NC243115}

## व्यवसायविषयक


महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC242942}

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC243104}

## योगा क्लासेस

शारीरिक आणि मानसिक आरोग्य निरोगी राहण्यासाठी योग शिका कपालभाती, प्राणायाम, मुद्रा, आसने फक्त 3500/- रुपये एक महिना (15+1 दिवस) अनिल - **9969351036** {NC243118}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**



लाल किल्ला तर लाल किल्ला, असे वाटून जफर राज्य करू लागले. तोच वजीर मुघलबेगने शाही खजिना, जडजवाहीर लुटून नेले. बहादुरशहा जफर हा मोगल साम्राज्याचा शेवटचा

**हा बादशाह एक उत्कृष्ट कवीही होता, पण तितकाच दुर्दैवी.. बादशहा बहादूरशहा जफर हे मुघल सम्राट दुसरा अकबरशाह व त्याची हिंदू राजपूत बायको लालबाई यांचा मुलगा होता. त्यांचे मूळ नाव अबू जफर सिराजुद्दीन मुहम्मद बहादूर शहा जफर. वडिलांच्या मृत्यूनंतर २८ सप्टेंबर १८३७ रोजी ते राज्यारूढ झाले. म्हणजे जेव्हा जफर यांचे वय होते ६२ वर्षे. बहादूरशाह जफर सत्तेवर आले तेव्हा दिल्लीला ब्रिटीशांनी विळखा घातला होता आणि त्यांची सत्ता फक्त लाल किल्ल्याच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली होती.**

# मोगल साम्राज्याचा शेवटचा बादशहा बहादूरशहा जफर



बादशहा ठरला. १८५७ मध्ये बहादूरशहा जफरला इंग्रजांनी पायउतार केले. इंग्रजांनी बहादुरशहा जफर यांना 'पातशाह' असा किताब देऊन त्याला नामधारी बादशहा बनवले. या बादशहाला वार्षिक १२ लाख तनखा मिळत असे. १८५७ च्या स्वातंत्र्य समरामध्ये नानासाहेब पेशवे यांच्या मसलतीस यश येऊन बहादूरशहा जफर या समरामध्ये सामील झाले. १८५७ च्या बंडात सर्व हिन्दू व मुस्लिम राजांनी त्याला सर्वानुमते हिन्दुस्तानचा सम्राट म्हणून दिल्लीच्या तख्तावर बसवले. बहादुरशहा जफर एक संवेदनशील कवी म्हणूनच प्रसिद्ध होते. त्यांचे बरेच काव्य १८५७ च्या धामधुमीत नष्ट झाले पण उरलेलेही अगदी अस्सल आहे. क्रांतिकारकांनी इंग्रजांकडून दिल्ली काबीज केली व बहादूरशहास बादशहा म्हणून जाहीर केले. हा वृद्ध बादशहा घोड्यावरून दिल्लीमध्ये रपेट मारू लागला. क्रांतिकारक सैन्याचे नेतृत्व करू लागला. या सैन्यात शिस्तीचा अभाव होता. दिल्ली मध्ये अनेक इंग्रज स्त्री-पुरूषांची या सैन्याने कत्तल केलेली होती. त्यांच्या बेशिस्त वर्तवणूकीमुळे बादशहा अडचणीत आला.१३३ दिवसांनंतर दिल्ली पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात गेली. दिल्ली ताब्यात घेतल्यानंतर इंग्रजांनी दिल्लीकरांचा अतोनात छळ केला. राजा म्हणून ब्रिटीशांचा विजय निश्चित झाल्यावर बहादुरशहा जफर, हुमायुनाच्या कबरीजवळ लपून बसले. ब्रिटीशानी तिथून त्यांना पकडले आणि त्यांच्या काही मुलांना गोळ्या घातल्या. या बादशहावर खटला भरून त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. बहादुरशहा जफर यांना ब्रह्मदेशातील रंगून येथे कैदेत ठेवण्यात आले. तेथील तुरूंगातच ७ नोव्हेंबर १८६२ साली बहादुरशहा जफर यांचे निधन झाले. बहादूरशाह जफरची कबर रंगूनमधे आहे. रंगूनमधील तिथल्या एका भिंतीवर माहितीचा दगड आहे.

**संजीव वेलणकर, पुणे**

# राशीभविष्य

सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४
संजय मनोहर

**मेष** चिंता आणि ताणतणाव, आत्मविश्वासाचा अभाव यामुळे निराशा येईल. झोप न मिळाल्याने आरोग्य बिघडणार नाही, याची काळजी घ्यावी. कौटुंबिक वातावरणात हेवेदावे वाढणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** निर्णय घेताना भान ठेवून आणि संयमाने वाटचाल करावी. गोष्टी वेळच्यावेळी हातावेगळ्या केल्याने त्रास कमी होईल. समोरील व्यक्तींकडून फसवणूक होणार नाही, म्हणून सावधानता बाळगावी.

**मिथुन** सुट्टीचा बेत अमलात आणण्यास चांगला दिवस राहील. ज्येष्ठांकडून कोणत्याही कार्यात मदत मिळण्याची अपेक्षा फोल ठरेल.

**कर्क** शेजाऱ्यांशी मतभेद टाळावेत. घरात नातेवाईकांची ढवळाढवळ खपवून घेऊ नये. खरेदीसाठीच्या मनातील कल्पना सफल होतील.

**सिंह** संततीमुळे अनपेक्षित समस्या आणि कटकारस्थानांना तोंड द्यावे लागेल. केलेल्या कार्यामुळे नोकरीत वरिष्ठ पदाची संधी मिळेल. आर्थिक प्राप्ती चांगली राहील.

**कन्या** कायदेशीर बाबींवर पैसा खर्च करण्याची वेळ येणार नाही, याची दक्षता घ्यावी. भाऊबंदकीचे त्रास वाढवतील.

**तूळ** कामे वेळेत करण्याच्या कटाक्ष पाळावा. जोडीदाराबरोबरचे नाते कायमचे दुरावणार नाही, यासाठी काळजी घ्यावी.

**वृश्चिक** कौटुंबिक प्रवास, सहल, मनोरंजन, गप्पाचा आनंद घ्याल. संततीने करिअरमधला महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे समाधान मिळेल.

**धनु** पैशाचे नियोजन करणे हितावह ठरेल. प्रसिद्धीच्या झोतात येण्याची संधी लाभेल. भावनातिरेकाने त्रास झाल्याचे निदर्शनास येईल.

**मकर** जोडीदाराचे प्रश्न सोडवू शकाल. तरुणांनी बोलण्यापेक्षा कृतीतून उत्तर देणे भाग पडेल. शक्यतो कोणाशी विशिष्ट घेऊ नये. कामाचा वेग वाढविणे जरुरीचे राहील.

**कुंभ** हरपलेला उत्साह आणि उमेद दामदुपटीने परत येईल. बदल, बढती, पगारवाढ या दृष्टीने केलेले प्रयत्न यश देतील.

**मीन** नोकरीत कामाचे दडपण व तणाव अधिक राहील. शुभकार्य यशस्वीपणे पार पडतील.

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 10/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 1748 | 5370 | 9313 | 8791 | 8157 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 7878 | 9953 | | | | | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0265 | 1497 | 5544 | 8050 | 8763 | | | | | |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1045 | 2000 | 2618 | 4430 | 4622 | 5969 | 6375 | 8173 | 9098 | 9876 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0840 | 1154 | 1454 | 1585 | 3962 | 4552 | 4882 | 5381 | 6230 | 6309 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 300/- | 0773 | 1718 | 2532 | 3635 | 4453 | 5172 | 5987 | 7279 | 7941 | 8952 |
| | 0808 | 1781 | 2632 | 3730 | 4496 | 5222 | 6010 | 7292 | 7974 | 9099 |
| 0005 | 0850 | 1861 | 2692 | 3743 | 4538 | 5280 | 6087 | 7298 | 8100 | 9255 |
| 0020 | 0911 | 1862 | 2751 | 3852 | 4539 | 5295 | 6373 | 7392 | 8140 | 9296 |
| 0049 | 1106 | 1911 | 2841 | 3853 | 4544 | 5299 | 6396 | 7473 | 8188 | 9367 |
| 0082 | 1118 | 1921 | 2872 | 3891 | 4564 | 5318 | 6405 | 7507 | 8348 | 9369 |
| 0085 | 1157 | 2029 | 2931 | 3906 | 4706 | 5508 | 6534 | 7528 | 8411 | 9408 |
| 0097 | 1161 | 2092 | 2982 | 3937 | 4708 | 5525 | 6546 | 7551 | 8577 | 9409 |
| 0140 | 1168 | 2121 | 3018 | 3973 | 4742 | 5547 | 6589 | 7570 | 8584 | 9451 |
| 0147 | 1177 | 2146 | 3134 | 3978 | 4748 | 5587 | 6685 | 7675 | 8587 | 9547 |
| 0151 | 1255 | 2208 | 3152 | 4025 | 4824 | 5650 | 6743 | 7711 | 8608 | 9589 |
| 0200 | 1286 | 2273 | 3185 | 4131 | 4894 | 5655 | 6747 | 7721 | 8624 | 9703 |
| 0396 | 1326 | 2341 | 3234 | 4146 | 4904 | 5703 | 6771 | 7739 | 8669 | 9869 |
| 0408 | 1454 | 2342 | 3248 | 4190 | 4929 | 5856 | 6800 | 7746 | 8681 | 9920 |
| 0538 | 1511 | 2359 | 3283 | 4337 | 5004 | 5859 | 6811 | 7763 | 8800 | 9923 |
| 0642 | 1512 | 2378 | 3326 | 4364 | 5046 | 5945 | 6957 | 7827 | 8802 | 9928 |
| 0660 | 1523 | 2419 | 3373 | 4390 | 5080 | 5955 | 7179 | 7847 | 8868 | 9929 |
| 0673 | 1551 | 2444 | 3444 | 4396 | 5086 | 5959 | 7188 | 7927 | 8887 | 9957 |
| 0769 | 1598 | 2524 | 3503 | 4449 | 5151 | 5960 | 7197 | 7932 | 8911 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ११/११/२०२४

| | | |
|---|---|---|
| ६ | १ | ७ |
| ६४ | १४ | ७३ |
| ६९ | १९ | ७८ |
| ३६७ | २३६ | २५० |
| १७८ | ५६० | ३६८ |

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 5:00
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 10/11/2024

पहिले बक्षिस रु. 10000/- — विक्रेता MG-09: 5229 — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — 7816

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | | | | |
|---|---|---|---|---|
| 3039 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 3951 (महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर) | 4228 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 7041 | 8368 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 400/- | 2041 | 2431 | 3279 | 4245 | 4802 | 5956 | 6686 | 7624 |
| 1303 | 2219 | 2482 | 3353 | 4305 | 5095 | 6022 | 6687 | 7671 |
| 1586 | 2222 | 2627 | 3631 | 4397 | 5107 | 6026 | 6822 | 7762 |
| 1787 | 2239 | 2728 | 3963 | 4486 | 5415 | 6118 | 7010 | 7796 |
| 1789 | 2257 | 2778 | 3983 | 4488 | 5493 | 6346 | 7071 | 7933 |
| 1801 | 2259 | 3034 | 4024 | 4604 | 5577 | 6606 | 7347 | 7983 |
| 1815 | 2286 | 3162 | 4168 | 4635 | 5736 | 6629 | 7400 | 8012 |
| 1891 | 2421 | 3168 | 4199 | 4747 | 5738 | 6640 | 7473 | 8269 |
| 2025 | 2425 | 3232 | 4220 | 4794 | 5850 | 6668 | 7549 | 8888 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र मोहिनी विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 10/11/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — MO-01 : 1462

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — 1098 — महाराजा लॉटरी सेंटर, इचलकरंजी

| तिसरे बक्षिस रु. 2000/- | | |
|---|---|---|
| 1920 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 3075 (प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण) | 5902 |

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1121 | 1996 | 3003 | 3936 | 5053 |
| 1192 | 2016 | 3197 | 4066 | 5342 |
| 1244 | 2146 | 3324 | 4289 | 5554 |
| 1363 | 2149 | 3353 | 4357 | 5665 |
| 1459 | 2690 | 3673 | 4400 | 5697 |
| 1589 | 2701 | 3774 | 4694 | 5765 |
| 1801 | 2824 | 3831 | 4970 | 5799 |
| 1815 | 2837 | 3847 | 5015 | 5950 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# उत्तर प्रदेशात पती, पत्नी आणि मुलाची स्क्रू ड्रायव्हरने हत्या

■ बिजनौर

उत्तर प्रदेशातील बिजनौरच्या खलिफा कॉलनीत तिहेरी हत्याकांड झाल्यामुळे एकच खळबळ उडाली. पती, पत्नी आणि मुलाची स्क्रू ड्रायव्हरने वार करून हत्या करण्यात आली. या घटनेनंतर परिसरात लोकांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी तिन्ही मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवले. ही हत्या कोणी केली आणि नेमके कोणत्या कारणामुळे हत्या झाली, हे मात्र उघड झाले नाही. ५० वर्षीय भुरा, त्याची पत्नी ४५ वर्षीय उबैदा आणि १८ वर्षांचा मुलगा याकूबसह घरात राहत होते. भुरा हा भंगार गोळा करण्याचे काम करत होता. त्याची आई हसीना आपल्या भावासोबत खलिफा कॉलनीत राहत होती. आज सकाळी आई भुरा यांच्या घरी आली असता दरवाजा आतून बंद होता. खिडकीतून डोकावून पाहिले असता त्यांना त्यांची सून उबेदा रक्ताच्या थारोळ्यात दिसली. त्यानंतर हसीना यांनी आरडाओरडा केला आणि कॉलनीतील लोक जमा झाले. दरवाजा तोडून आत पाहिले असता दुसऱ्या खोलीत याकुब आणि भुरा यांचे मृतदेह आढळले.

# कामशेत भागात महिलांची पाण्यासाठी पायपीट सुरू

■ मावळ

मावळ तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या कामशेतच्या माऊलीनगर भागात दोन दोन दिवसांपासून पाणीपुरवठा बंद आहे.त्यामुळे येथील महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.यासंदर्भात कामशेत ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. कामशेत शहरातील काही भागातील पाणीपुरवठा ठप्प झाला आहे.पंधरा दिवसांत दोन वेळा पाण्याची मोटार बिघडत आहे.त्यामुळे नागरिकांचे पाण्याविना हाल होत आहेत.नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्यामुळे महिलांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.तक्रारींकडे पंचायतीकडून दुर्लक्ष केले जात असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## गोव्यात बनतेय १०० मीटर लांबीची हातमागावरील 'कुणबी साडी'

■ पणजी

**सध्या** सुरू असलेल्या अमेझिंग गोवा संमेलनामध्ये राय येथील ऊर्जा प्रशिक्षण आणि संशोधन अकादमीतर्फे एक आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे.या उपक्रमांतर्गत याठिकाणी आतापर्यंतची सर्वात मोठी कुणबी साडी हातमागावर विणली जात आहे. ही साडी तब्बल १०० मीटर लांबीची असणार आहे.



या साडीची 'गोल्डन बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये नवा विक्रम म्हणून नोंद केली जाणार आहे. आतापर्यंतची हातमागावरील सर्वात मोठी कुणबी साडी ही ४० मीटर लांबीची आहे.पण या संमेलनातील साडी ही १०० मीटर लांबीची आहे.सध्या या साडीचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे.पुढील दोन दिवसांत ही १०० मीटर लांबीची साडी तयार होईल,असा विश्वास ऊर्जा प्रशिक्षण आणि संशोधन अकादमीच्या संचालिका डॉ. स्नेहा भागवत यांनी व्यक्त केला आहे.

## अंबर किल्ल्यातील हत्ती सफारीच्या दरात कपात

■ जयपूर

**राजस्थानातील** अंबर किल्ल्यातील हत्ती सफारीच्या दरात एक हजाराची कपात करण्याचा निर्णय राजस्थान सरकारने घेतला असून त्या विरोधात हत्तीमालक न्यायालयात जाणार आहेत. राजस्थानात लवकरच सुरु होणारा पर्यटन हंगाम, राजस्थान गुंतवणूक परिषद व आयफा पुरस्कार सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर हे दर कमी करण्यात आले आहेत. पर्यटन विभागाने या हत्तीसफारीचा आढवा घेतल्यानंतर ही दरकपात केली आहे. या आधी या हत्तीसफारीसाठी अडीच हजार रुपये मोजावे लागत होते. १५ नोव्हेंबरपासून हे दर दीडहजार रुपये करण्यात आले. या संदर्भात पर्यटन विभागाने कोणतेही कारण दिलेले नाही.

देश विदेश

## कॅनडा मंदिरातील हल्लाप्रकरणी एकाला अटक


■ टोरांटो

**कॅनडामध्ये** गेल्या आठवड्यात एका हिंदू मंदिरात झालेल्या हल्ला प्रकरणी कॅनडा पोलिसांनी आज आणखी एकाला ताब्यात घेतले आहे. ब्रॅम्पटन येथे राहणाऱ्या इंद्रसील गोसल याला या प्रकरणी अटक करण्यात आली असून त्याच्यावर हल्ला केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. तो सिख फॉर जस्टीस चा प्रमुख गुरपतवंत पन्नूचा महत्त्वाचा साथीदार आहे.

गेल्या आठवड्यात भारतीय दूतावासाद्वारे आयोजित जीवन प्रमाणपत्र कार्यक्रमासाठी एका मंदिरात जमलेल्या लोकांवर सिख फॉर जस्टीस संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. त्यांनी आधी निदर्शने केली. मात्र त्यांच्याकडील झेंड्यांच्या काठीने त्यांनी जमावावर हल्ला केला होता. या जमावामध्ये गोसलही होता व तोही मारहाणीत सहभागी होता. त्याची काही अटींवर मुक्तता करण्यात आली असून त्याला लवकरच न्यायालयासमोर सादर केले जाणार आहे. याआधीही एकाला याप्रकरणी अटक करण्यात आली होती.

## जपानचा लाकडी उपग्रह प्रक्षेपित सहा महिने अंतराळात राहणार

■ टोकियो



**जपानने** लाकडापासून बनवलेला जगातील पहिला उपग्रह लिग्नोसॅट प्रक्षेपित केला. हे उपग्रह ६ महिने अंतराळात राहील आणि तापमानापासून ते वैश्विक किरणोत्सर्गापर्यंत सर्व बाबींची चाचणी करणार आहे. या उपग्रहाची रचना मॅग्नोलिया लाकडापासून बनवण्यात आली आहे.

लिग्नोसेट पूर्णपणे मॅग्नोलिया लाकडापासून बनविला आहे, ते फक्त १० सेमी लांब आणि फक्त ९०० ग्रॅम वजनाचे आहे. क्योटो विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या पथकाने हा उपग्रह विकसित केला आहे. या मोहिमेमागील उद्देश हा लाकडाचा वापर करून पर्यावरणपूरक उपग्रह बनवणे आहे.

## तामिळ प्रसिद्ध अभिनेते दिल्ली गणेश यांचे निधन



■ चेन्नई

**तामिळ** चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध आणि दिग्गज अभिनेते दिल्ली गणेश यांचे चेन्नईत एका रुग्णालयात काल रात्री निधन झाले. वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांचा मुलगा महादेवनने इन्स्टाग्रामवर पोस्ट केली की, आम्हाला कळवताना अतिशय दुःख होत आहे की, माझे वडील दिल्ली गणेश यांचे रात्री ११ वाजता निधन झाले.

दिल्ली गणेश यांच्यावर अंतिम संस्कार ११ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता होणार आहे. त्यांच्या निधनाने दक्षिणेकडील उद्योगजगतात शोककळा पसरली. चाहत्यांसोबतच इंडस्ट्रीतील सेलिब्रिटींनीही त्यांना श्रद्धांजली वाहिली.

## नव्या सरन्यायाधीश खन्नानी आपला 'मॉर्निंग वॉक' बंद केला

■ नवी दिल्ली



**भारताचे** ५१ वे सरन्यायाधीश म्हणून संजीव खन्ना हे उद्या सोमवार ११ नोव्हेंबर रोजी शपथ घेणार आहेत. पण त्यांच्याबाबत एक वेगळीच घटना समोर आली आहे. नवे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आपला मॉर्निंग वॉक थांबवला आहे. खन्ना हे दररोज सकाळी दिल्लीतील लोधी गार्डन परिसरात मॉर्निंग वॉक करायचे. पण आता ते सरन्यायाधीश होणार असल्याचे निश्चित झाल्याने त्यांना सरकारने एकट्याने मॉर्निंग वॉक करु नये असा सल्ला दिला आहे.

मॉर्निंग वॉक करताना त्यांनी प्रोटोकॉलनुसार आपल्या सुरक्षा टीमला सोबत ठेवावे लागेल. पण एवढ्या कारणासाठी सुरक्षा रक्षक सोबत घेऊन जाणे त्यांना योग्य वाटत नसल्याने त्यांनी आपला मॉर्निंग वॉकच बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

## ट्रम्प यांच्या विजयानंतर तरुणींची अजब चळवळ

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेच्या** राष्ट्राध्यपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्पने दणदणीत विजय नोंदवला. त्यानंतर अमेरिकेतील तरुणींनी एक अजब चळवळ सुरू करण्याची घोषणा केली. त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना मत देणाऱ्या पुरूषांशी लग्न करू नका आणि प्रेम करू नका, असे ठरवले.

ट्रम्प यांच्या विजयामुळे उदारमतवादी तरुणींत नाराजी निर्माण झाली. या तरुणींचा दावा आहे की, ज्या पुरुषांनी ट्रम्प यांना मतदान केले आहे, त्यांच्याशी त्या कोणत्याही प्रकारचे भावनिक, शारीरिक किंवा सामाजिक नाते ठेवणार नाहीत. या तरूणांनी पुढील ४ वर्षांसाठी ही चळवळ सुरु केली आहे. या चळवळीला ४बी म्हणून ओळखली जाणार आहे.

## हिंसाचाराच्या ४ प्रकरणांमध्ये इम्रान खान यांना जामीन मंजूर

■ लाहोर

**लाहोरमध्ये** झालेल्या हिंसाचाराच्या चार प्रकरणांत पाकिस्तानचे माजी पंतप्रधान आणि पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफचे अध्यक्ष इम्रान खान यांना दहशतवादविरोधी न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यामुळे इम्रान खान यांना दिलासा मिळाला. हिंसाचाराच्या आणखी आठ प्रकरणांची सुनावणी न्यायालयाने ३० नोव्हेंबरपर्यंत पुढे ढकलली. त्यांच्याविरोधात तोशाखाना प्रकरणासह अनेक खटले सुरू आहे. सध्या रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात आहे.

लाहोरमध्ये ९ मे २०२३ रोजी झालेल्या हिंसाचाराच्या संदर्भात १२ प्रकरणांमध्ये इम्रान खान यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यांना मॉडेल टाऊन भागात पाकिस्तान मुस्लीम लीग नवाझचे (पीएमएल-एन) कार्यालय जाळणे, कलमा चौकाजवळ कंटेनर, गुलबर्ग येथील पोलीस वाहने आणि शेरपाव पुलावरील हिंसाचार या चार गुन्ह्यांप्रकरणी न्यायालयाने जामीन मंजूर करण्यात आला.

## नवीन वैद्यकीय महाविद्यालय अर्ज करण्यासाठी मुदतवाढ



■ मुंबई

**राष्ट्रीय** आयुर्विज्ञान आयोगाने राज्यात नवीन पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यासाठी आणि महाविद्यालयात जागा वाढविण्यासाठी अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे.या दोन्ही बाबींसाठी ही मुदतवाढ २२ नोव्हेंबरपर्यंत देण्यात आली आहे.

आगामी शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याबाबत तसेच महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा वाढविण्यासाठी अर्ज करण्याचे वैद्यकीय मूल्यांकन आणि क्रमवारी मंडळाने आवाहन केले होते. हे मंडळ राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाशी संलग्न आहे. याबाबतचे परिपत्रक १८ सप्टेंबर रोजी मंडळाकडून जारी करण्यात आले होते. त्यामध्ये राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या संकेतस्थळावर १७ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याची सूचना करण्यात आली होती. त्यानंतर ही मुदत ८ नोव्हेंबर करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात शैक्षणिक संस्थांकडून अर्ज करण्यास मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेता आता अर्ज सादर करण्यास पुन्हा २२ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.यावेळी अर्ज करण्यासंदर्भातील अटी व शर्ती परिपत्रकानुसार कायम राहणार आहेत.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामध्ये नव्या पट्टेरी वाघाचे आगमन

■ कराड

**विदर्भाबाहेर** असलेला महाराष्ट्रातील एकमेव सह्याद्री व्याघ्रप्रकल्प पश्चिम महाराष्ट्रात वसलेला आहे. या प्रसिद्ध सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात आधीच एक पट्टेरी वाघ असताना आता नव्या वाघाचे आगमन झाले आहे. हा वाघ ट्रॅप कॅमेऱ्यात कैद झाला असून तो नर जातीचा आहे. या नव्या पट्टेरी वाघाची ओळख पटलेली नाही. त्यामुळे त्याचे नामकरण 'एसटीआर-१' असे करण्यात आले आहे.



गेल्यावर्षी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात एका पट्टेरी वाघाचे अस्तित्व आढळून आले होते. २०१८ नंतर प्रथमच गेल्यावर्षी १७ डिसेंबर रोजी या वाघाची या प्रकल्पात नोंद झाली होती. त्यानंतर आता नव्या वाघाचे आगमन झाले आहे. या नर वाघाचे छायाचित्र कॅमेऱ्याने टिपले आहे. विशेष म्हणजे या वाघाची ओळख पटली आहे.

## उत्तर महाराष्ट्र गारठला! पारा १६ अंशांच्या खाली

■ पुणे

**राज्यातील** किमान तापमानात घट होऊ लागल्याने थंडी हळूहळू वाढणार असल्याचे हे संकेत आहेत. उत्तर महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा १६ अंशांच्या खाली आल्याने गारठा वाढला आहे. उर्वरित राज्यात अद्याप थंडीची प्रतीक्षा आहे.

धुळे येथील कृषी महाविद्यालयात काल शनिवारी राज्यातील नीचांकी १३.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.राज्यात तापमानातील चढ-उतार सुरूच राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे.ही प्रणाली तामिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनाऱ्याकडे

### उर्वरित राज्य थंडीच्या प्रतिक्षेत

येण्याचे संकेत आहेत. पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा कायम आहे. आग्नेय अरबी समुद्रात लक्षद्वीप बेटांजवळ चक्राकार वाऱ्यांची स्थिती टिकून आहे. कोकणात उन्हाचा चटका अधिक असला तरी उर्वरित राज्यात कमाल तापमान हळूहळू कमी होत आहे. राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यात किमान तापमानाचा पारा घसरू लागला आहे. मध्य महाराष्ट्रात पहाटेच्यावेळी गारठा वाढला आहे. राज्यात कमाल-किमान तापमानातील तफावत कायम आहे. राज्याच्या किमान तापमानात घट होत असली तरी थंडीची प्रतीक्षा कायम आहे. मध्य राज्यातील धुळ्यासह निफाड, नाशिक,जळगाव, अहिल्यानगर, महाबळेश्वर, पुणे येथे किमान तापमान १६ अंशांच्या खाली आले आहे.

## फुलंब्रीत दुकानाला भीषण आग! तिघांचा मृत्यू

■ संभाजीनगर

**संभाजीनगर** येथील फुलंब्री जवळील दरी फाटा येथे एका प्लास्टिक साहित्य विकीच्या दुकानाला मध्यरात्री भीषण आग लागली. या घटनेत तीन जण जळून ठार झाले तर दोन जण गंभीर जखमी झाले. नितीन रमेश नागरे (२५), गजानन वाघ (३०), राजू सलीम पटेल (२५) अशी मृतांची नावे आहेत. तर शाहरुख पटेल व अजय नागरे हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या दोघांवर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. ही घटना काल मध्यरात्री घडली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागली असावी असा अंदाज वर्तवला जात आहे.

फुलंब्री येथे दरी फाटा भागात राजू स्टील आणि प्लास्टिक नावाचे दुकान असून या दुकानात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक साहित्य भरलेले होते. काल रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास दुकानातील आतील भागात शॉर्टसर्किट झाले. यामुळे या दुकानाला आग लागली. दुकानात प्लॅस्टिक असल्याने आगीने उग्र रूप धारण केले. यामुळे दुकानात मोठ्या प्रमाणात धुके व गॅस तयार झाला. आग लागल्याची माहिती दुकान मालक व शेजारी असलेल्या दुकान मालकांना समजली. यावेळी ते आग विझवण्यासाठी घटनास्थळी पोहचले. त्यांनी दुकानाचे शटर उघडताच आतमध्ये तयार झालेल्या गॅसमुळे तीन कामगार वेगाने बाहेर फेकले गेले, यात ते लोखंडी पार्टवर आदळले आणि आगीत होरपळले.

## गोरेगावमध्ये टेम्पोत स्फोट एकाचा मृत्यू! एक गंभीर

■ मुंबई

**गोरेगाव** पश्चिमेच्या मोतीलालनगरात टेम्पोत मोठा स्फोट होऊन आग लागली. या स्फोटामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला. सद्दाम हुसेन (२३) असे या मृत तरुणाचे नाव आहे.

मोतीलालनगरमध्ये एका टेम्पोमधील एसीत बिघाड झाला होता. त्याची दुरुस्ती सुरू असताना अचानक स्फोट झाला. स्फोटानंतर टेम्पोला आग लागली. या स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी धाव घेऊन आग विझवली. एसीची दुरूस्ती करणाऱ्या एकाचा मृत्यू तर दुसरा गंभीर जखमी झाला. या स्फोटामध्ये टेम्पोचे मोठे नुकसान झाले. टेम्पो जळून खाक झाला आहे. तर त्याठिकाणी आसपास उभ्या असणाऱ्या वाहनांचे देखील नुकसान झाले.

## डहाणू तालुक्यातील चिकूचे उत्पादन निम्म्याने घटले

■ पालघर

**जगाच्या** नकाशावर नावाजलेला डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध चिकू बदलत्या वातावरणामुळे धोक्यात आला आहे. लहरी वातावरणामुळे रोगराईचा प्रादुर्भाव झाल्याने यंदा येथील चिकूचे उत्पादन निम्म्याहून जास्त घटले आहे. त्यामुळे बागायतदार चिंतेत दिसत आहेत.

शेकडो वर्षांपासुन पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या डहाणूच्या चिकूला भौगोलिक नामांकन मिळाले आहे. मात्र आता हाच चिकू मोठ्या संकटात सापडला आहे. सध्याचे बदलते तापमान, अवेळी पडणारा पाऊस आणि वाढत्या औद्योगिकरणामुळे चिकू फळावर कीड, रोगाचा प्रादुर्भाव होत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे चिकूच्या बागा कापण्याची वेळ शेतकऱ्यांवर



बदलत्या हवामानामुळे रोगराईचा प्रादुर्भाव

आली असल्याची खंत येथील बागायतदार व्यक्त करत आहेत. डहाणू तालुक्यातील घोलवड येथील चिकूला आंतरराष्ट्रीय बाजारातही मोठी मागणी असते. मात्र आता बदलत्या वातावरणामुळे हाच चिकू नाहीसा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## सावंतवाडी मतदारसंघातील 'वंचित'च्या ८ पदाधिकाऱ्यांची पक्षातून हकालपट्टी

■ सावंतवाडी

**सावंतवाडी** विधानसभा मतदारसंघात वंचित बहुजन आघाडीने अधिकृतरित्या कोणालाही सहकार्य केलेले नाही. असे असताना काही पदाधिकाऱ्यांनी एका उमेदवाराला परस्पर निर्णय घेऊन जाहीर पाठिंबा व्यक्त केला होता. या ८ जणांची हकालपट्टी वंचितच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांनी केली आहे.

वंचित बहुजन आघाडीने हकालपट्टीची कारवाई केलेल्या पदाधिकाऱ्यांमध्ये प्रदीप कांबळे,मानसी सांगेलकर, आनंद जाधव, नवसो कदम, चेतन जाधव, संदेश जाधव,विनोद कदम, काशिराम असनकर यांचा समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीने या मतदारसंघात अधिकृतरित्या कोणालाही सहकार्य केलेले नाही. कोणत्याही पदाधिकाऱ्यांना वैयक्तिक निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला नाही.असे असताना या पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंबा दर्शवून पक्ष शिस्तीचा भंग केला आहे. त्यामुळे त्यांची वंचित बहुजन आघाडीतून हकालपट्टी करण्यात आली आहे.

## अजित पवार गटाचे आमदार टिंगरे यांची शरद पवारांसह काँग्रेस, ठाकरे गटाला नोटीस

■ पुणे

**विधानसभा** निवडणुकीच्या रणधुमाळीत शरद पवार यांना अजित पवार गटाचे आमदार सुनिल टिंगरे यांनी नोटीस पाठवली आहे. सुप्रिया सुळे यांनी सुनील टिंगरे यांनी नोटिस पाठवल्याचा आरोप केला होता. मात्र हा आरोप फेटाळत काल सुनील टिंगरे यांनी नोटीस पाठवली नसल्याचे सांगितलं होते. त्यानंतर आता शरद पवार यांच्यासह काँग्रेस, ठाकरे गटाला सुनील टिंगरे यांनी नोटीस पाठवली असल्याचे स्पष्ट झाले आहे. बदनामी केल्याप्रकरणी टिंगरे यांनी ही नोटीस पाठवली आहे. या नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, जर आपली बदनामी करण्यात आली तर आपण फौजदारी कारवाई करू आणि ही नोटीस पक्षप्रमुख या नात्याने शरद पवार यांना मिळाली. त्यांच्या पक्ष कार्यालयात ही नोटीस दिली. त्याचबरोबर सुप्रिया सुळे आणि बापू पठारेंचा मुलगा सुरेंद्र पठारे हे आपल्याबद्दल सोशल मिडीयावर अवमानकारक मजकूर लिहीत असल्याचेही या नोटीशीत म्हटले आहे.



पोर्श कार अपघातप्रकरणी सुनील टिंगरे यांनी आरोपीला मदत केल्याचा आरोप झाला होता. त्यात शरद पवार यांनी देखील भर सभेत सुनील टिंगरे यांचे नाव घेतले होते. याच पार्श्वभूमीवर सुनील टिंगरे यांनी आता सगळ्यांना नोटीस दिली आहे.

## ओसाड घरांच्या विक्रीसाठी म्हाडाची जनजागृती मोहीम आचारसंहितेत अडकली

■ मुंबई

**म्हाडाच्या** कोंकण मंडळाने विविध भागात बांधलेल्या घरांपैकी ११,१७६ घरे गेले अनेक वर्षांपासून विक्रीविना ओसाड पडून आहेत. या घरांच्या विक्रीसाठी विविध जाहीरातींच्या माध्यमातून करण्यात येणारी जनजागृती मोहीम निवडणूक आचारसंहितेत अडकली आहे. अशी माहिती एक अधिकाऱ्यांने दिली.

विरारा बोळींज, कल्याण खोणी, गोठेघर, ठाणे भांडारली, शिरढोण आदि भागात ही एकूण ११,१७६ घरे विक्रीविना धुळखात पडून आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर येथील घरांची विक्री करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे. यासाठी वर्तमानपत्रे, एफ.एम. रेडिओ, सोशल मीडिया, रेल्वे स्थानके यांच्या माध्यमातून घरांच्या विक्रीची जाहिराती करण्याचा म्हाडाचा विचार होता. सर्व नियोजन ही करण्याचा म्हाडाचा विचार होता. सर्व नियोजन ही करण्यात आले होते. पण आचारसंहितेमुळे जाहिरातबाजी तुर्तास थांबविण्यात आल्या.

## रत्नागिरीत मतदान जागृतीसाठी मॅरेथॉन

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** विधानसभा मतदारसंघात आज मतदार जनजागृतीसाठी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. पोलीस मैदानातून सुरू झालेल्या या मॅरेथॉनला जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह, जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी आदी अधिकाऱ्यांनी हिरवा झेंडा दाखवला. भाट्ये समुद्रकिनाऱ्यावर या मॅरेथॉनची सांगता झाली.



विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी सर्व नागरिकांनी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. जिल्ह्यात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. मात्र मतदानाची टक्केवारी कमी असते. म्हणून जिल्ह्यातील मतदान अधिकाधिक व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. असेही ते म्हणाले. या वेळी स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करून, सर्वांनी मतदानाची शपथ घेतली. कोस्टल मॅरेथॉनचे पथक, सायकल असोसिएशनसह पोलीस अधिकारी आणि कर्मचारी या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते.

## हडपसरमध्ये महिलेची हत्या पलंगात मृतदेह आढळला

■ पुणे

**पती** कामावर गेल्यानंतर घरात एकट्या असलेल्या महिलेची हत्या करून मृतदेह पलंगाच्या कप्प्यात लपवून ठेवल्याची घटना उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना हडपसर भागातील फुरसुंगी परिसरात घडली. महिलेच्या हत्येमागचे कारण समजू शकले नाही.

स्वप्नाली पवार (२४) अशी हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. स्वप्नालीचे पती उमेश मोटारचालक आहेत. ते काल सकाळी पाच वाजता बीडला गेले होते. रात्री आठ वाजता ते घरी परतले. तेव्हा घराला बाहेरून कडी होती. कडी उघडल्यानंतर पत्नी घरात दिसली नाही. त्यांनी पत्नीचा शोध घेतला. घरातील दागिने, रोकड, पत्नीचा मोबाईल शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. दागिने, रोकड पलंगात ठेवली का, हे पाहण्यासाठी त्यांनी पलंग उघडला. तेव्हा पत्नीचा मृतदेह पलंगातील कप्प्यात ठेवल्याचे उघडकीस आले.

## मुंबई विमानतळावर कचऱ्यातून सोन्याची तस्करी

■ मुंबई

**मुंबई** विमानतळावर काल कचऱ्याच्या डब्यातून सोन्याची तस्करी करण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला असून याप्रकरणी एका महिलेला व विमानतळावरील काही कंत्राटी कर्मचाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पेस्टच्या रुपात असलेल्या या ३ किलो सोन्याची किंमत जवळजवळ अडीच कोटी रुपये आहे.



महिलेला अटक

मुंबई विमानतळावर काल उतरलेल्या इवाय २०० या विमानातून हे सोने आले होते. त्यानंतर ते कचऱ्याच्या डब्यातून बाहेर काढण्यात आले व एका महिलेच्या ताब्यात देण्यात आले. ही महिला विमानतळातून बाहेर पडत असताना राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या जवानांनी तिला अटक केली. ही महिला तिच्याकडे असलेल्या परवान्याच्या आधारे हे सोने विमानतळाच्या बाहेर नेण्याचा प्रयत्न करत होती. लगद्याच्या स्वरुपात असलेले हे सोने ३,३५० ग्रॅम वजनाचे असून त्याची किंमत २ कोटी ६७ लाख रुपये आहे. या तस्करी प्रकरणात विमानतळावर सेवा देणाऱ्या दोन खासगी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पर्यटन उद्योगाचे विघटन

**दरवर्षी** साधारणपणे डिसेंबर ते मे महिन्याच्या अखेरीपर्यंत देशात आणि विदेशात पर्यटनासाठी जाणाऱ्यांची विशेष गर्दी होत असते. शाळांना सुट्टया नसतानादेखील वातावरणातला उत्साह लक्षात घेऊनच लोक पर्यटनाला बाहेर पडतात. खूप थंडीही नाही आणि उष्णताही नाही. असा हा पर्यटनासाठी पोषक स्वरूपाचा काळ असतो. याच काळामध्ये परदेशातून भारतात येणाऱ्यांची संख्यादेखील बरीच वाढलेली असते. साधारणत गेल्या पंधरा वर्षात भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या परदेशी लोकांची संख्या सातत्याने वाढते आहे. म्हणूनच सरकारनेदेखील इनक्रेडिबल इंडिया किंवा अतुल्य भारतसारख्या जाहीराती करून पर्यटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारतातले पर्यटन हे प्रामुख्याने निसर्गसुंदर आणि आध्यात्मिक स्वरूपाचे मानले जाते. या काळामध्ये जम्मू काश्मीर, उत्तराखंड, केरळ या राज्यांमध्ये निसर्गाचा आनंद घेणारे सर्वाधिक पर्यटक जातात. तर वेगवेगळ्या तीर्थस्थळांना भेटी देणाऱ्यांची संख्यादेखील गेल्या काही वर्षात प्रचंड प्रमाणात वाढली आहे. अर्थातच निसर्गातील ठिकाणे पाहात असताना अनेक पर्यटक तीर्थस्थळांचाही अनुभव घेतात. भारतातल्या जवळपास प्रत्येक प्रांतामध्ये नैसर्गिक सौंदर्यस्थळे , ऐतिहासिक किंवा पूरातत्वविषयक स्थळं आणि तीर्थस्थळे ही एकत्रितपणे पाहाता येतात. यासाठी उत्तर भारत विशेषत्वाने प्रसिद्ध मानला जातो. काश्मीर , उत्तराखंड, उत्तरप्रदेश, हिमाचल प्रदेश, अगदी राजस्थानपर्यंत निसर्ग आणि तीर्थस्थळांचा एकत्रित अनुभव पर्यटकांना घेता येतो. पर्यटनाची प्रचंड ताकद भारतातल्या सगळ्या प्रांतांमध्ये असूनही त्याचा तितक्या गांभिर्याने विचार झालेला दिसत नाही. अगदी मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्येसुद्धा पर्यटनाच्या माप संधी आहेत. परंतु सत्ता किंवा राजकारणाच्या धुंदीमध्ये या पर्यटन संधींचे कोणालाही सोने करता आले नाही. अपवाद फक्त उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, काश्मीर, राजस्थान आणि गोव्याचा देता येतो. त्याखालोखाल ओरिसा आणि केरळचा नंबर लागतो. बाकी राज्यांमध्ये पर्यटनाचा गांभिर्याने प्रचार प्रसार झाला नसल्याचे पाहायला मिळते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे केंद्र आणि राज्यांचे समन्वय साधणारे कोणतेही धोरण नाही.

### अर्थव्यवस्था आणि रोजगार

पर्यटनाबाबतची केंद्र आणि राज्याची उदासिनता कशी असेल याचे निदर्शक म्हणजे १९५८ ला वाहतूक मंत्रालयाच्या अंतर्गतच पर्यटन विभाग सुरू झाला. त्याच्याकडे गांभिर्याने पाहिले नाही. १९७० च्या दशकात स्वतंत्र पर्यटन मंत्रालय अस्तित्वात आले. पण निश्चित धोरणच नसल्याने पर्यटनही अधांतरी राहिले. जगातील अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटन व्यवसायातून टिकवली जाते. भारतात हाच पर्यटन उद्योग अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लावू शकतो. ज्याप्रमाणे हिमाचल, जम्मू-काश्मिर, गोवा, उत्तराखंड, राजस्थान, ओरिसा, केरळ या राज्यांनी पर्यटनाच्या माध्यमातून अनेक पायाभूत सोयीसुविधा निर्माण करून घेतल्या आणि एकूण राज्याच्या महसूलातही मोठी वाढ केली. एकट्या राजस्थानने पर्यटनातून दरवर्षी चाळीस हजार कोटी रूपये उत्पन्न मिळेल इतकी त्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले होते. हिमाचल, उत्तराखंड इथे तर स्थानिक लोकसंख्येपेक्षा बाहेरून येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असते. गेल्या दशकात परदेशी पर्यटकांच्या संख्येत जवळपास पाच टक्क्यांनी वाढ झाली आणि आता ती पंधरा टक्क्यांच्यावर जात आहे. दरवर्षी भारतात तीन ते चार कोटी परदेशी पर्यटक येतात. अर्थात ही संख्या काही उत्साहवर्धक नाही. परंतु एकूणच पर्यटन क्षेत्राचा आयाम जर बघितला तर त्यातून आर्थिक उत्पन्नाबरोबरच रोजगार , पायाभूत सोयीसुविधा , परकीय चलन, अशा अनेक गोष्टींचा लाभ होत राहातो. वर्ल्ड टूरिझम कौन्सिलने २०२१ पर्यंत पर्यटनामुळे अनेक देशांच्या रोजगारामध्ये दहा टक्क्यांनी वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला होता आणि तो खराही ठरला आहे. तंत्रज्ञानामुळे पर्यटन क्षेत्राला जी प्रचंड गती मिळाली. त्यातून रोजगाराच्याही आणखी काही संधी निर्माण झाल्या. ऑनलाईन तिकीट बुकिंग करण्यापासून ते जगातल्या कुठल्याही पर्यटनस्थळी आपल्याला हव्या त्या सोयीसुविधांची ऑनलाईन नोंदणी करता येणे शक्य झाले आहे. एक सर्व्हिस इंडस्ट्री म्हणून पर्यटनाने निर्माण केलेले स्थान अर्थव्यवस्थेला मोठा आधार देणारे तर ठरू शकते शिवाय समाजव्यवस्थेसाठीसुद्धा पर्यटनाची खूप मोठी मदत प्राप्त होऊ शकते.

### महाराष्ट्रातली दूरावस्था

इतकी मोठी क्षमता असूनही भारतातल्या पर्यटनाबाबत कमालीची हेळसांड होताना दिसते. काही राज्यांचा अपवाद वगळला. तर अजूनही पर्यटनाबाबत मिळणाऱ्या सोयीसुविधांसंदर्भात नाराजीच व्यक्त होताना दिसते. फार दूर जाण्याची गरज नाही. आपल्या महाराष्ट्राने या क्षेत्राकडे जे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे त्यावरून महाराष्ट्र हा पर्यटनाबाबत किती अरसिक आहे हेच त्यातून सिद्ध होते. कोकणासारखा निसर्गसुंदर परिसर , सह्याद्रीच्या कुशीतले डोंगरकिल्ले, गडकपारी , अजिंठा वेरूळच्या लेण्या आणि अनेक तीर्थक्षेत्रे याचा विचार केला तर महाराष्ट्र हा पर्यटनामध्ये क्रमांक एकवर जाऊ शकतो. अगदी केवळ जीवाची मुंबई करण्यासाठी देशाच्या अनेक भागातील लोक मुंबईत येतात. परंतु त्यांना मुंबई दर्शन घडवून आणण्याची महाराष्ट्र पर्यटन मंडळाकडे कोणतीही व्यवस्था नाही. जी आहे ती अत्यंत तुटपुंजी आणि हलगर्जीपणा दाखवणारी ठरते. कुठल्याही तीर्थस्थळी किंवा पर्यटनस्थळी महाराष्ट्र पर्यटन महामंडळाची कार्यक्षम किंवा तत्पर कोणतीही सेवा उपलब्ध होत नाही. खाजगी स्तरावर ज्या व्यक्ती किंवा संस्थांना पर्यटन व्यवसायात पुढाकार घ्यायचा असतो त्यांनासुद्धा अपेक्षित असे प्रोत्साहन मिळत नाही. याचा अर्थ सरकारलाच या क्षेत्रातून मिळणारा महसूल नको आहे आणि रोजगारही वाढू द्यायचा नाही. असे त्यातून स्पष्ट होते. स्वतंत्र पर्यटन मंत्रालय असूनही त्यासाठी पुरेसे आणि अभ्यासपूर्ण नियोजनच कधी होत नाही. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र नंबर एकवर आहे पण मग या उद्योगांमध्ये पर्यटन उद्योग येत नाही का असा प्रश्न निर्माण होतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**ज्याप्रमाणे फळे लागल्यामुळे झाडे लवतात, पाण्याने भरल्यामुळे काळे ढग खाली येतात त्याचप्रमाणे समृद्धी आल्यानंतरसुद्धा चांगले लोक उद्धट न होता नम्र राहतात कारण परोपकार हा त्यांचा स्वभाव असतो.**

## पंचांग

**सोमवार, ११ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**





**कार्तिक शुक्ल दशमी**
**नक्षत्र : शततारका**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

**रवी उदय- ०६-४५**
**रवी अस्त- १८-००**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### दुधी कोफ्ता करी

★ **साहित्य** - १ छोटी दुधी, १/२ कप बेसन, १ टीस्पून जिरे, १ टीस्पून धने पावडर, २ मोठे टोमॅटो, १/२ टीस्पून हळद, १/२ टीस्पून लाल तिखट, १/३ टीस्पून आल्याचा तुकडा, ४ लवंग लसूण, १/२ टीस्पून गरम मसाला, १/२ टीस्पून मसाला, क्रीम किंवा मलई घाला. आवश्यकतेनुसार स्वयंपाकाचे तेल,चवीनुसार मीठ

★ **कृती** - दुधीचे कोफ्ते बनवण्यासाठी सर्वप्रथम लहान आकाराची दुधी धुवून घ्या. आता ही दुधी किसून एका भांड्यात ठेवा. यानंतर यात बेसन आणि वर नमूद केलेले सर्व मसाले टाका आणि मिक्स करा. दुसरीकडे गॅसवर एक कढई ठेवा आणि यात तेल टाका. तेल गरम झाले की, तयार मिश्रणाचे गोळे तयार करून तेलात टाका आणि मध्यम आचेवर छान तळून घ्या. आता करी तयार करण्यासाठी मिक्सरच्या भांड्यात कांदा, टोमॅटो, लसूण आणि आले टाकून पेस्ट तयार करून घ्या. यानंतर गॅसवर दुसरी एक कढई ठेवून यात तेल टाका आणि जिरे, मोहरी, कडीपत्याची फोडणी द्या. मग तयार प्युरी तेलात टाका आणि ४-५ मिनिटे शिजवून घ्या. आता यात हळद, मसाला, गरम मसाला आणि मलई घाला आणि व्यवस्थित मिक्स करून शिजू द्या. सर्व मसाल्यांना तेल सुटू लागले की यात थोडे पाणी घाला आणि उकळी येईपर्यंत शिजवा. शेवटी यात तयार कोफ्ते आणि चिरलेली कोथिंबीर घाला आणि झाकण ठेवून गॅस बंद करातयार दुधीचे कोफ्ते गरमा गरम खाण्यासाठी सर्व्ह करा



# २२ वर्षानंतर पाकिस्तानने इतिहास घडवला ऑस्ट्रेलियात एकदिवसीय मालिका जिंकली

**पाकिस्तानने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ८ गडी राखून पराभव केला. यासह संघाने ३ सामन्यांची मालिका २-१ अशी जिंकली. २२ वर्षानंतर पाकिस्तानने ऑस्ट्रेलियाचा त्यांच्याच देशात झालेल्या वनडे मालिकेत पराभव केला आहे. यापूर्वी २०२२ मध्ये त्यांचा पराभव झाला होता. पाकिस्तानच्या भेदक माऱ्यासमोर ऑस्ट्रेलियाची फलंदाजी ढेपाळली.त्यांचे ५ प्रमुख फलंदाज अवघ्या ५५ धावांवर तंबूत परतले . फलंदाजांचे अपयश हेच ऑस्ट्रेलियाच्या पराभवाचे प्रमुख कारण आहे. शाईन आफ्रिदी व नसीम शहाने प्रत्येकी ३ तर रौफने २ बळी घेतले.**



■ पर्थ

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्वीकारले त्यानंतर पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजीला सुरुंग लावला ऑस्ट्रेलियाने ८८ धावांत ६ विकेट्स गमावल्यानंतर ८व्या क्रमांकाचा फलंदाज शॉन बॉटने संघाची धावसंख्या १४० च्या पुढे नेली. तो ३० धावा करत संघाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला. त्याने डम झाम्पासोबत ३० आणि स्पेन्सर जॉन्सनसोबत २२ धावांची भागीदारी केली. बाकी शोर्ट २२, मॅकगुरक ७ , हार्डी १२, कर्णधार इंग्लिश ७ , कोन्नोली ७, मॅक्सवेल ०, स्टोईनिश ८ हे झटपट बाद झाले आणि ऑस्ट्रेलियाचा डाव ३१. ५ शतकात १४० धावांवर आटोपला. त्यानंतर पाकिस्तानने या धावांचा पाठलाग करताना सलामीवीर अयुब ४२, शफिक ३७ ,यांनी केलेल्या ८४ धावांच्या भागीदारीच्या जोरावर संघाला विजयाच्या जवळ नेवून ठेवले. त्यानंतर बाबर आझम नाबाद २८ आणि कर्णधार रिझवान नाबाद ३० या जोडीने पाकिस्तानला लक्ष्य गाठून दिले. अशा तऱ्हेने पाकिस्तानने ऑस्ट्रेलियावर ८ गडी राखून विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाकडून मॉरिसने २ बळी घेतले. ऑस्ट्रेलिया सारख्या बलाढ्य संघाला त्यांच्याच देशात झालेल्या एक दिवशीय मालिकेत पराभूत करून ऑस्ट्रेलियाने २२ वर्षानंतर इतिहास घडवला आहे.

## भारतीय हॉकी संघाचा कर्णधार हरमनप्रीतला २०२४ चा सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार जाहीर



■ नवी दिल्ली

आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनने आपल्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा केली असून यात भारताच्या दोन हॉकी खेळाडूंना सन्मानित करण्यात आले आहे. भारताच्या हॉकी संघाचे कर्णधार हरमनप्रीत सिंह याला वर्ष २०२४ साठी एफआईएचचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. तर दुसरीकडे भारताचा माजी गोलकिपर पीआर श्रीजेशला सर्वोत्कृष्ट गोलकिपर म्हणून निवडले गेले आहे. हा पुरस्कार दोन्ही खेळाडूंना ओमानमध्ये आयोजित ४९ व्या आंतरराष्ट्रीय हॉकी फेडरेशनमध्ये दिला जाणार आहे. हर्मन सिंहने हा पुरस्कार जिंकून नेदरलँडच्या जोएप डी मोल आणि थियरी ब्रिंकमॅन, जर्मनीच्या हेंस मुलर आणि इंग्लंडच्या जॅक वालेस याला मागे टाकले आहे.

## पृथ्वी शॉ चे मुंबई संघात पुनरागमन

■ मुंबई



पृथ्वी शॉ याचे मुंबई संघात पुनरागमन झाले आहे. पृथ्वीची आगामी सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे. मुंबई क्रिकेट निवड समितीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी सय्यद मुश्ताक अली स्पर्धेसाठी २८ संभावित नावांची घोषणा केली. मुंबई क्रिकेट असोसिएशनने प्रसिद्धीपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली आहे.मुंबई निवड समितीने २८ संभावित खेळाडूंची नावं जाहीर केली आहेत. या संघात पृथ्वी शॉ व्यतिरिक्त मुंबईचा कर्णधार आणि अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे आणि श्रेयस अय्यर याचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे पृथ्वी शॉ या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करुन सर्वांचं लक्ष वेधण्याच्या प्रयत्नात असणार आहे. पृथ्वीला आयपीएलच्या १८ व्या मोसमासाठी दिल्ली कॅपिट्ल्सने रिटेन केलेले नाही.

## थरारक सामन्यात पुणेरी पलटणचा १ गुणाने पराभव

■ हैदराबाद




विजय मलिकने कौशल्यपूर्ण चढाईत वसूल केलेल्या ८ बोनस गुणांच्या जोरावर अखेरच्या सेकंदापर्यंत श्वास रोखून धरायला लावलेल्या सामन्यात तेलुगु टायटन्सने गुणतक्त्यात आघाडीवर असणाऱ्या पुणेरी पलटणचा ३४-३३ असा एका गुणाने पराभव केला. प्रो कबड्डीच्या ११व्या पर्वातील घरच्या मैदानावरील मोहिमेची सांगता तेलुगु टायटन्सने विजयाने केली. या विजयासह तेलुगु टायटन्स गुणतालिकेत पलटणपाठोपाठ दुसऱ्या स्थानावर आले आहे. सामन्यातील पूर्वार्ध जेवढा रंगतदार झाला, तेवढा सामन्याच्या उत्तरार्धातील अखेरची दोन मिनिटे श्वास रोखून धरायला लावणारी ठरली. बचावाच्या आघाडीवर दोन्ही संघांना फारसे यश मिळाले नसले, तरी दोन्ही संघाच्या चढाईपटूंनी निर्विवाद वर्चस्व राखले. पूर्वार्धातच गुडघ्यात चमक आल्याने पुणेरी पलटणचा कर्णधार अस्लम इनामदारला बाहेर जावे लागले. याचा पलटणच्या खेळावर जरुर परिणाम झाला. त्याची उणिव पंकज मोहितने भरुन काढली. त्याने ९ गुणांची कमाई केली. पण, त्याला अन्य चढाईपटूंकडून तेवढी साथ मिळाली नाही.

## पंतबाबत सीएसकेची असमर्थता

■ बंगळुरू

आम्ही अजूनही प्रयत्न करू पण मला वाटत नाही की आम्ही पंतला विकत घेऊ शकू.' असे चेन्नई सुपर किंग्जचे सीईओ विश्वनाथन यांनी माजी सीएसके खेळाडू अंबाती रायडू यांच्याशी संवाद साधताना सांगितले, 'आम्ही सीएसकेची रिटेंशन यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड, एम. एस. धोनी आणि प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांच्याशी दीर्घ चर्चा केली. संघाला पुढे नेण्याची क्षमता कोणत्या खेळाडूंमध्ये आहे याबाबत आम्ही स्पष्ट होतो. रिटेन केलेले खेळाडू सीएसकेला पुढे नेण्यात सक्षम आहेत. गायकवाड, जडेजा, धोनी, शिवम दुबे आणि मथिशा पाथिराना यांना रिटेन करणे खूप सोपे होते. पण आम्हाला माहीत होतं की आम्ही सगळ्यांना कायम ठेवले तर आमच्याकडे लिलावात जास्त पैसे राहणार नाहीत. लिलावादरम्यान भारताचे सर्वोत्कृष्ट खेळाडू जेव्हा येतील तेव्हा आम्ही निश्चितपणे वेगळा विचार करू असेही ते म्हणाले.

## पहिल्या टी-२० सामन्यात श्रीलंकेचा न्यूझीलंडवर विजय



■ कोलंबो

श्रीलंका आणि न्यूझीलंड यांच्यात दोन सामन्यांची टी-२० मालिका सुरु आहे. या मालिकेतील पहिला सामना श्रीलंकेने जिंकला आणि मालिकेत १-० ने आघाडी घेतली. न्यूझीलंडने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र न्यूझीलंडला अपेक्षित धावसंख्या उभारता आली नाही. न्यूझीलंडने १९.३ षटकात सर्व गडी गमावून १३५ धावा केल्या आणि विजयासाठी १३६ धावांचे आव्हान दिलं. हे आव्हान श्रीलंकेने १९ व्या षटकात ४ गडी राखून पूर्ण केलं. खरं तर हे सोपं आव्हान असलं तरी चिवट झुंज द्यावी लागली. न्यूझीलंडमध्ये पहिलाच सामना जिंकल्याने आत्मविश्वास वाढला आहे. श्रीलंकेने भेदक गोलंदाजी केली. श्रीलंकेच्या फलंदाजांना डोकेच वर काढू दिलं नाही. दुनिथ वेल्लालगेने २० धावा देत तीन गडी बाद केले. तर नुवान तुषारा, वानिंदु हसरंगा आणि मथीशआ पथिराना यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. महिश थीक्षाणाला एक गडी बाद करण्यात यश आले.

## एलआयसी-आयडियल बुध्दिबळ: राघव, अहान, नील, आद्विक विजेते

■ मुंबई




आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी-ग्रुपतर्फे बालदिनानिमित्त लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत एलआयसी-आयडियल कप शतक महोत्सवी बुध्दिबळ स्पर्धेचे विविध वयोगटातील विजेतेपद मुलांमध्ये राघव संचेती, अहान जॉली, नील भंडारी, आद्विक अगरवाल यांनी तर मुलींमध्ये आध्या पाठक, आराध्या पुरो, अक्षा मंगलापल्ली, आर्या नाईक यांनी जिंकले. ७ वर्षाखालील गटात पाचव्या निर्णायक साखळी फेरीमध्ये राघव संचेतीने अपराजित शंतनू जोशीची (४ गुण) विजयी दौड रोखली आणि सर्वाधिक साखळी ४.५ गुणासह प्रथम स्थानावर झेप घेतली. परिणामी शंतनू जोशीला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. शर्विल मामळूस्करने (४ गुण) तृतीय, डेत्यन लोबोने (३.५ गुण) चौथा, तत्त्वा शेजवळने (३.५ गुण) पाचवा आणि मुलींमध्ये आध्या पाठकने (४ गुण) प्रथम व निकिता संदीपने (३ गुण) द्वितीय क्रमांक मिळविला. ९ वर्षाखालील मुलांमध्ये अहान जॉलीने (४ गुण) प्रथम, कृषिव गालाने (३.५ गुण) द्वितीय, अगस्त्य गुरवने (३ गुण) तृतीय,तर मुलींमध्ये आराध्या पुरोने (४.५ गुण) प्रथम, आराध्या कामतने (२.५ गुण) द्वितीय; स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीचे सेक्रेटरी राजन राणे, क्रीडाप्रेमी विलास डांगे व चंद्रकांत करंगुटकर, मुंबई शहर बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

# म्युच्युअल फंडची पॅसिव्ह स्कीम म्हणजे काय?




**सध्या म्युच्युअल फंडच्या पॅसिव्ह स्कीममध्ये गुंतवणूकदारांचा कल वाढत आहे. विशेष म्हणजे यावर्षी पॅसिव्ह स्कीमच्या ६२ नवीन फंड ऑफर लाँच करण्यात आले. गतवर्षी ५१ पॅसिव्ह फंड लाँच करण्यात आले होते. आकडेवारीचे आकलन केल्यास दीर्घकाळात पॅसिव्ह फंडचा परतावा इक्विटी फंडपेक्षा अधिक राहिला आहे.**

यावर्षी म्युच्युअल फंडच्या पॅसिव्ह स्कीमने गुंतवणुकदारांची उत्सुकता वाढविली आहे. इक्विटी एमएफच्या डेटा'च्या माहितीनुसार म्युच्युअल फंडचे एकूण १०६ न्यू फंड ऑफर लाँच झाले आणि त्यापैकी ६३ फंड पॅसिव्ह स्कीमचे होते. २०२३ मध्ये ५१ पॅसिव्ह फंड लाँच झाले. गेल्या काही वर्षात वाढत्या परताव्याने पॅसिव्ह फंडकडे गुंतवणूकदारांचा कल वाढला आहे.

**पॅसिव्ह फंडचा अर्थ काय**

पॅसिव्ह फंड म्हणजे बेंचमार्क इंडेसनुसार गुंतवणूक करणे. म्हणून या फंडला मॅनेज करण्यासाठी फंड मॅनजरची गरज भासत नाही. उदा. एखाद्या पॅसिव्ह फंडचा बेंचमार्क इंडेस निफ्टी ५० असेल तर तो फंड केवळ निफ्टी ५० मध्ये सहभागी असलेल्या कंपन्यांतील शेअरमध्ये गुंतवणूक करेल. तुमची गुंतवणूक निफ्टीच्या ५० मधील प्रत्येक कंपनीच्या प्रभावानुसार विभागली जाते. या

Mahamoney.com

फंडचे व्यवस्थापन करण्यासाठी मॅनेजर नसतो आणि त्यामुळे त्याचा एस्पेन्स रेशो कमी राहतो.

**बेंचमार्कपेक्षा अधिक परताव्याचा दबाव नाही**

पॅसिव्ह फंडची अधिक ग्रोथ होण्याचे कारण म्हणजे एखाद्या सक्रिय फंडप्रमाणे बेंचमार्कपेक्षा अधिक परतावा देण्याचा दबाव पॅसिव्ह फंडवर नसतो. प्रामुख्याने लार्जकॅप फंडच्या बाबतीत असा अनुभव येतो. दुसरे म्हणजे पॅसिव्ह फंडला समजून घेणे सोपे आहे आणि त्याचे कॉस्ट स्ट्रचर पाहिले तर त्याचा खर्चही कमी राहतो. म्हणून रिटेल आणि जुने असे दोन्ही प्रकारच्या गुंतवणूकदारांना हा चांगला पर्याय राहतो.

**दीर्घकाळासाठी इक्विटी फंडापेक्षा चांगली कामगिरी**

पॅसिव्ह फंडची कामगिरी साधारणपणे अर्थव्यवस्थेच्या स्थितीवर अवलंबून असते. भारतासारख्या अर्थव्यवस्थेत पॅसिव्ह फंडची कामगिरी ॲटिव्हली मॅनेज्ड फंडच्या तुलनेत चांगली राहिलेली आहे. कारण एस्पोजर अधिक असते आणि चढउतार देखील कमी राहते. दहा वर्षाच्या काळात पॅसिव्ह फंडने ९० टक्के मॅनेज्ड फंडच्या तुलनेत चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे हा फंड दीर्घकाळाच्या गुंतवणुकीसाठी सुरक्षित आहे.

**वैविध्यपणाच्या आघाडीवर दमदार**

पॅसिव्ह फंडचा फायदा म्हणजे पोर्टफोलिओच्या डायव्हर्सिफिकेशनच्या दृष्टीने हा फंड चांगला मानला जातो. प्रामुख्याने रिटेल गुंतवणुकदारांसाठी हा फंड फायद्याचा आहे. कारण गुंतवणूक केल्यानंतर कोणत्याही प्रकारचा दबाव फंडवर येत नाही. ज्यांना सक्रिय मॅनेजमेंट नको असेल, अशा गुंतवणूकदारांसाठी पॅसिव्ह फंड उपयुक्त आहे.

# मासेमारी बोटींची संख्या वाढल्याने बर्फाचा तुटवडा

■ उरण

**विविध** बंदरांतील मासेमारी बोटींची संख्या अचानक वाढल्याने आणि वातावरणातील उष्मा वाढत असल्याने औद्योगिक क्षेत्रातून येणाऱ्या बर्फाचा तुटवडा जाणवू लागला आहे.यामुळे मच्छीमार हैराण झाले आहेत.

करंजा, ससून डॉक, मोरा, कसारा आणि इतर अनेक बंदरांतून दररोज मासेमारीसाठी सुमारे ५०० ते ६०० बोटी समुद्रात रवाना होतात. मात्र या बंदरांतून मासेमारीसाठी जाणाऱ्या बोटींची संख्या अचानक वाढली आहे. परिणामी मासळीसाठी बर्फाचीही मागणी वाढू लागली आहे. खोल समुद्रातील मासेमारीसाठी बोटींना

**मच्छीमार हैराण**

८ ते १२ दिवसांचा कालावधी लागतो. एवढ्या दिवसांत पकडलेली मासळी ताजी ठेवण्यासाठी लागणाऱ्या बर्फाचा तुटवडा जाणवत आहे. एका मासेमारी बोटीला एक ट्रिपसाठी १० ते १२ टन बर्फाची गरज भासते. २२०० रुपये प्रति टन दराने मच्छीमार बर्फ खरेदी करतात. मुंबई, नवी मुंबई औद्योगिक क्षेत्रातून मच्छीमारांना मागणीप्रमाणे बर्फाचा पुरवठा केला जातो. कसारा बंदरातच ३५०-४०० मच्छीमार बोटींच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे मच्छीमारांची बर्फाची मागणीही वाढत चालली आहे.दुसरीकडे उष्माही वाढत चालल्याने आईस्क्रीम, शीतपेये, सरबतांसाठी बर्फाची मागणी वाढली आहे. त्यामुळे बर्फ पुरवठ्यावर मर्यादा आल्या असल्याचे बर्फ पुरवठादारांकडून सांगितले जात आहे.

# 'बटोगे तो कटोगे' घोषणा लग्नपत्रिकेवर छापली

■ गांधीनगर

**उत्तरप्रदेशचे** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिलेली 'बटोगे तो कटोगे' ही घोषणा सध्या देशभरात चर्चेत आहे. ती गुजरातमधील एका व्यक्तिने आपल्या भावाच्या लग्नपत्रिकेवर छापली आहे. ही लग्नपत्रिका समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. गुजरातमधील



भावनगरमध्ये एका भाजपा कार्यकर्त्याने भावाच्या लग्नाच्या पत्रिकेवर 'बटोगे तो कटोगे' नारा छापला आहे. पंतप्रधान मोदी, योगी आदित्यनाथ व राम मंदिराचा फोटोदेखील छापला आहे. २३ नोव्हेंबरला हा विवाह सोहळा होणार आहे. ही लग्नपत्रिका सध्या चर्चेत आहे. भाजपा कार्यकर्त्याने सांगितले की, लोकांना जागरूक करण्यासाठी व पंतप्रधान मोदींचा संदेश पसरण्यासाठी आम्ही लग्नपत्रिकेवर ही घोषणा छापली आहे.

**जाहिर नोटीस**

बॉम्बे सिव्हिल अपिलीय अधिकारक्षेत्रातील उच्च न्यायालयाच्या न्यायदानात अंतरिम अर्ज क्र. 2023 चे 17726 पहिले अपिल क्र. 10719 OF 2011 भीमराव कृष्णा ठोंबरे मयत झाल्यापासून. नारायण कृष्णा ठोंबरे व पीओए सुरेंद्र एस. ठोंबरे....अर्जदार

विरुद्ध

बबन फुले (मयत) आणि इतर .....

....प्रतिसादकर्ते

उत्तराधिकारी क्रमांक १ मयत असल्याची माहिती आहे मात्र, त्याचे कायदेशीर वारस सापडलेले नाहीत. कायद्यानुसार आवश्यक ती पावले उचलण्यासाठी आम्ही वर्तमान पत्रात जाहिरात देत आहोत. जे कोणी मयत बबन फुले यांचे वारस असतील त्यांनी पुढील सुनावणीस दि. २५/११/२०२४ या तारखेला हजर रहावे. आपण सुनावणीस हजर नाही राहिलात तर न्यायालय कायद्यानुसार निर्णय घेईल प्रतिसाद करत्याना कळवण्यात येत आहे की सुनावणीस हजर रहावे.

अधिवक्ता

श्री प्रवीण गर्जे (ॲड. मुंबई हायकोर्ट) श्रीवाणी

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
TESTAMENTARY & INTESTATE JURISDICTION
JUDGES ORDER NO. 163 OF 2024
IN
PETITION NO. 1630 OF 2023**

**NOTICE** Petition for Succession Certificate in respect of certain securities belonging to the Late Mrs. VIJAYALAXMI BHANUPRASAD SUTHAR, Occ. Housewife, Married, Hindu, Indian, Inhabitant Mumbai, who was residing at time of death at 20, Balasinor Society, SV Road, Kandivali (W), Mumbai-400067. .......... Deceased

**PUSHKAR BHANUPRASAD SUTHAR,** aged about 59 years, Occ. Architect, Hindu, Indian, Inhabitant Mumbai, residing at 801, Laxmi Narayan Krupa, Bapubhaivashi Road, Vile Parle (W), Mumbai-400056, being the son of deceased above named. .......... Petitioner

To,
**MRS. CHHAYA KIRAN PATKAR @ CHHAYA BHANUPRASAD SUTHAR**
Bunglow No.20, Balasinor Society, S.V. Road, opp. Fire Brigade, Kandivali (W), Mumbai- 400067.

Please note that above mentioned matter was listed before the Hon'ble Shri Justice N.J. Jamadar on 1st October,2024 When the Hon'ble Court has directed to issue notice to non-consenting heirs to be published on the newspapers "Free Press Journal" and "Navakal" returnable on **26th November, 2024.**

You are therefore directed to remain present before the court presided over by the Hon'ble Shri Justice N. J. Jamadar in Court Room No. 03, Main Building, High Court, Bombay on 26th November, 2024 at 10.30 am. Onwards or before any other Hon'ble Court hearing such matter either in person or through your Advocate.

You are hereby informed that the free legal services from the State Legal Services Authorities, High Court Legal Services Committees, District Legal Services Authorities and Taluka Legal Services Committees as per eligibility criteria are available to you and in case, you are eligible and desire to avail the free legal services, you may contact any of the above Legal Services Authorities/Committees.

WITNESS DEVENDRA KUMAR UPADHYAYA CHIEF JUSTICE, at Bombay, aforesaid this **5th** day of **November, 2024**

Sd/-
For Prothonotary and Senior Master
Sd/-
Sealer
This 05th day of November, 2024

Seal

**L. K. Sharma**
Advocate for the Petitioner

# नोटांच्या तुकड्यांचा ट्रक जळून खाक

■ नागपूर

**वर्ध्याच्या** बरबटी येथे आज सकाळी नोटांच्या तुकड्यांनी भरलेला ट्रक अचानक जळून खाक झाला. या घटनेची माहिती मिळताच बरबटीसह आसपासच्या गावातील लोकांची गर्दी झाली होती. १६ चाकांचा ट्रक हैदराबादहून उत्तर प्रदेशच्या दिशेने जात होता. या ट्रकमध्ये चलनी नोटांच्या तुकड्यांचा स्क्रॅप माल होता. शॉर्टसर्किटमुळे या ट्रकला आग लागून तो जळून खाक झाला. रिझर्व्ह बँकेने नुकताच नोटांच्या तुकड्यांचा लिलाव केला होता. हा माल वाहून ट्रकमधून नेला जात होता.



# माथेरानच्या राणीचा विस्टाडोमविनाच प्रवास

■ मुंबई

**माथेरानची** राणी अर्थात मिनी ट्रेनला विस्टाडोम डबा जोडला नसल्याने पर्यटकांच्या आनंदावर विरजण पडले. बुधवारपासून माथेरानच्या राणीची सफर सुरू झाली. मिनी ट्रेनला विस्टाडोम डबा जोडला जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात विस्टाडोम डब्याविनाच मिनी ट्रेनचा प्रवास सुरू झाल्याने अनेक पर्यटकांनी नाराजी व्यक्त केली.

मध्य रेल्वेची ११७ वर्षांची नेरळ-माथेरान मिनी टॉय ट्रेन भारतातील पर्वतीय रेल्वेपैकी एक आहे. त्यामुळे या ट्रेनमधून प्रवास करण्यासाठी पर्यटकांची गर्दी होते. २०१९ मध्ये नेरळ-माथेरान मिनी ट्रेनच्या विस्टाडोम डब्याचे लोकार्पण केले. विस्टाडोम डबा जोडल्याने अधिक पर्यटक मिनी ट्रेनकडे ओढले गेले. पारदर्शक काचेच्या खिडक्या आणि छत असलेल्या विस्टाडोम डब्यातून संपूर्ण निसर्गरम्य वातावरण पाहता येते. तसेच डब्याच्या आतील भागात सेल्फीसाठी विशेष जागा आहे. आकर्षक रंग, नावीन्यपूर्ण अंतर्गत सजावट अशा अनेक सुविधा या विस्टाडोममध्ये अंतर्भूत असल्याने, पर्यटक जादा तिकिटांचे पैसे खर्च करून विस्टाडोम डब्याने प्रवास करत होते.

# मायावती यांच्या बसपातून ३ पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी

■ लखनौ

उत्तर प्रदेशात विधानसभा पोटनिवडणुकीचा प्रचार सुरू असताना माजी मुख्यमंत्री मायावतींच्या बसपाने मेरठचे प्रभारी प्रशांत गौतम, जिल्हा प्रभारी दिनेश काझीपूर आणि महावीर प्रधान यांची पक्षविरोधी काम केल्याच्या आरोपावरून पक्षातून हकालपट्टी केली.

हकालपट्टी झाल्यानंतर प्रशांत गौतम यांनी सांगितले की, बसपा हायकमांडचे पीए मेवालाल गौतम यांनी फोन करून आम्हाला राष्ट्रीय सरचिटणीस मुंकद अली यांच्या मुलाच्या लग्नाला न जाण्याची सूचना केली होती. ज्याचा ऑडिओ आमच्याकडे आहे. मुंकद अलीशी आमचे संबंध पक्षीय नसून कौटुंबिक संबंध आहेत. त्यामुळे आम्ही गुरुवारी लग्नसमारंभाला हजेरी लावली होती.

# शिरूरच्या आमदाराच्या मुलाचे अपहरण! १० कोटींची मागणी

■ पुणे

**शिरूर** मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार आणि उमेदवार अशोक पवार यांचा मुलगा ऋषिराज पवार (३०) याचे अपहरण करण्यात आले होते. ऋषिराज पवारचे अपहरण करून त्याला विवस्त्र केले आणि त्यानंतर एका महिलेसोबत त्याचे अश्लील व्हिडिओ-फोटो काढले. ते व्हिडिओ-फोटो व्हायरल करण्याची धमकी देत १० कोटी रुपयांची खंडणी मागितली. याप्रकरणी ऋषिराज पवार यांनी एका महिलेसह चार जणांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी भाऊ कोळपेसह एकाला अटक केली आहे.या प्रकरणामागे विरोधकांचा हात असल्याचा आरोप आमदार पवार यांच्या कुटुंबाने केला आहे.

**दोन जण अटकेत**

त्यांचे वकील ॲड.असीम सरोदे म्हणाले की, काल दुपारी २ वाजेच्या सुमारास काही कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशासाठी मांडवगण फराटा येथे बैठक असल्याचे सांगून भाऊ कोळपे हा कार्यकर्ता ऋषिराज पवारला मांडवगण फराटा येथे घेऊन गेला. यावेळी कोळपेसह चार जणांनी ऋषिराजला एका घरात डांबून त्याचे हातपाय बांधले. त्याला विवस्त्र करुन त्या ठिकाणी एक महिलेस आणले. तिलाही विवस्त्र करीत त्या दोघांचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडीओ काढले. तुमच्या विरोधातील लोक आमच्या संपर्कात असून तुझे अश्लिल व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत १० कोटी रुपये खंडणीची मागणी तिघांनी केली. याप्रकरणी ऋषिराज पवारने सांगितले की,आरोपींनी आता काही पैसे द्या सांगितले. मी त्यांचा विश्वास बसावा म्हणून गोड बोलून त्यांना माझ्या मित्राच्या घरापर्यंत नेले. मित्रांना सांगून ठेवल्याने त्यांनी आरोपीस धरून ठेवले. दोन जणांना आरोपींनी व्हिडिओ पाठवले होते ते मी डिलीट केले. मयूर काळे, तुषार कांबळे अशी इतर दोन आरोपी नावे असून त्यातील एक जणास पोलिसांनी अटक केली आहे.

# परवानगीशिवाय मुख्यमंत्र्यांचा फोटो शेअर करण्यास हिमाचलमध्ये मनाई

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशात सामोसा प्रकरणामुळे मोठा वाद निर्माण झाल्यानंतर आता मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय त्यांचा फोटो शेअर करू नये असे आदेश जारी करण्यात आले आहेत. सामोसा प्रकरणात मुख्यमंत्र्यांच्या फोटोमुळे त्यांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यामुळे भविष्यात असे प्रकार घडू नयेत यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाकडून एक महत्त्वाचा आदेश जारी करण्यात आला आहे त्यानुसार यापुढे सरकारी अधिकाऱ्यांच्या बैठका, सार्वजनिक कार्यक्रम आदी ठिकाणी मुख्यमंत्र्यांचे घेतलेले फोटो सोशल मीडिया अथवा प्रसार माध्यमांमध्ये शेअर करण्यापूर्वी राज्य सरकारच्या माहिती व प्रसारण विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

# गोवाच्या मोपा विमानतळावर पहिले पोलंडचे विमान दाखल

■ पणजी

**गोव्यातील** मोपा येथील मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी पोलंडमधून एंटर एअरच्या पहिल्या हंगामी चार्टर फ्लाइटचे स्वागत करण्यात आले.या विमानातून १८४ पर्यटक गोव्यात दाखल झाले आहेत.

वॉर्सा आणि काटोविस येथून थेट उड्डाणे गोव्याला पोलंडशी जोडतात.गोव्याचे पर्यटन वाढणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी ही विमान सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मोपा विमानतळाचे सीईओ शेषन यांनी सांगितले. दर सोमवार आणि शुक्रवारी ही सेवा कार्यरत असेल. मोपा विमानतळ आंतरराष्ट्रीय आणि चार्टर उड्डाणांसाठी एक पसंतीचे विमानतळ म्हणून उदयास येत आहे. गेल्या काही महिन्यांत मॉस्को, ताश्कंद, गॅटविक आणि मँचेस्टर यांच्याशी हवाई संपर्क स्थापित केला आहे असे शेषन यांनी सांगितले.

# ट्रम्प यांच्यावरील फौजदारी खटल्यांची कालमर्यादा रद्द



■ टोकियो

**अमेरिकेतील** राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजयी झालेले डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात सुरु असलेल्या फौजदारी खटल्यांची सुनावणीसाठीची कालमर्यादा बाजूला ठेवण्याचा निर्णय अमेरिकेच्या न्यायमूर्तींनी घेतला आहे. ट्रम्प हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेत असून त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

अमेरिकेच्या जिल्हा न्यायाधीश तान्या चुटकन यांनी वॉशिंग्टनमध्ये विशेष काऊंसिल जॅक स्मिथ यांची या सुनावणीची कालमर्यादा बाजूला ठेवण्याची विनंती मान्य केली. फिर्यादी पक्षाने ही सरकारला या स्थितीवर तोडगा काढण्यासाठी वेळ मिळावा म्हणून ही कालमर्यादा बाजूला ठेवावी असे म्हटले होते. ट्रम्प यांच्या फौजदारी खटल्यांमध्ये न्यायालयीन धोरणांचाही विचार करावा लागणार आहे. १९७० सालच्या न्यायालयीन धोरणानुसार अमेरिकेच्या विद्यमान राष्ट्राध्यक्षांच्या विरोधात फोजदारी खटले चालवता येत नाहीत. अमेरिकेतील विधी व न्याय विभाग राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील फौजदारी खटल्यांचे काय करावे यावर विचारविनिमय करत आहे.

# नॉयडा एक्सप्रेसवेवर अपघातात ५ जण ठार

■ नवी दिल्ली

**उत्तर** प्रदेशातील गौतमबुद्ध नगर जिल्ह्यात नॉयडा ग्रेटर नॉयडा एक्सप्रेसवेवर आज सकाळी झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला आहे. महामार्गावर उभ्या असलेल्या एका ट्रकला कार धडकल्याने हा अपघात घडला.

नॉयडा एक्सप्रेसवेवर एक बंद पडलेला ट्रक उभा होता. त्याचवेळी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास एक कार या ट्रकला पाठीमागून धडकली. हा अपघात इतका भीषण होता की कारमधील पाचही जणांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत यातील मृतदेह बाहेर काढले.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

*(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)*

Name of Political Party : **Nationalist Congress Party (NCP)**

Name of Election : **Maharashtra Legislative Assembly 2024**

Name of state/UT : **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of candidate | Name of Constit-uency | Pending criminal cases | | Details about cases of conviction for criminal offences | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed |
| 1 | Daulat Bhika Daroda | 135-Shahapur (ST) | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 109/98 CCN 97/98 | IPC Section-147,148,149,452,323,427 | Not applicable | Not applicable |
| 2 | | | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 279/2010 | IPC Section-341,143 | Not applicable | Not applicable |
| 3 | | | Bhiwandi Civil. And Criminal Court Gunha GR No. 111/2011 R.C.C./1200 212/2014 | IPC Section- 143, 147, 148, 341, 427, 323, 504, 506 sub section 149 | Not applicable | Not applicable |
| 4 | | | Shahapur Civil. And Criminal Court Gunha GR No 235/2014 | IPC Section-143, 147, 149, 341, 188 | Not applicable | Not applicable |

नवाकाळ
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com




# चंदेरी च्वींगम




## ‘ए रियल एनकाऊंटर’ येणार १५ नोव्हेंबरला




गुजरातमधील एका सत्य घटनेवर आधारलेला ‘ए रियल एन्काऊंटर’ हा थ्रिलर चित्रपट येत्या शुक्रवारी १५ नोव्हेंबरला प्रदर्शित होतोय. साबीर शेख यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे, तर प्रदीप चुरीवाल यांच्या मॅकनील इंजिनियरिंग लिमिटेड बॅनरखाली याची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटात शाहबाज खान यांनी एन्काऊंटर स्पेशलिस्टची भूमिका साकारली आहे. शाहबाज खान, एहसान खान, मुश्ताक खान, रझा मुराद, अली खान, हिमायत आलम अली, अखिलेश वर्मा, ब्रतुति गांगुली, अनिल नागरथ, राकेश पुजारा, संगीता सिंग, ऋषिकेश तिवारी, अमृत दुजारी आणि कलीम अख्तर यांच्या यात प्रमुख भूमिका आहेत. विशेष म्हणजे हिंदी व्यतिरिक्त हा चित्रपट गुजरातीतही प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात एक कोर्टरूम ड्रामाही आहे. दिग्दर्शक सबीर शेख यांनी या चित्रपटातून पालकांना मुलांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता अधोरेखित केली आहे.


## मृणाल कुलकर्णींच्या हिंदी सिनेमाचा ट्रेलर



मराठी चित्रपटांमधील प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांची प्रमुख भूमिका असलेला ‘ढाई आखर’ या आगामी सिनेमाचे ट्रेलर नुकतेच सोशल मीडियावर दाखल झाले आहे. प्रवीण अरोरा यांचे दिग्दर्शन असलेला हा सिनेमा अमरीक सिंह दीप यांच्या ‘तीर्थाटन के बाद’ या कादंबरीवर बेतलेला आहे. ट्रेलरमध्ये प्रेमाच्या भावना आणि मानवी नात्यांची गुंतागुंत दिसते. या चित्रपटात घरगुती हिंसा दर्शवण्यात आली आहे, ज्यातून एक महिला तिची ओळख शोधण्यासाठी संघर्ष करताना दिसते. मृणाल कुलकर्णी या चित्रपटात हर्षिता या मुख्य भूमिकेत दिसणार आहेत, तर हरीश खन्ना आणि मराठमोळा रोहित कोकाटे यांच्याही यात महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटाची पटकथा आणि संवाद सुप्रसिद्ध लेखक असगर वजाहत यांनी लिहिले आहेत, तर गीते या इरशाद कामिल यांची आहेत.

## ब्रह्मांडनायक करण्याचे भाग्य

‘जय जय स्वामी समर्थ’ या कलर्स मराठी वाहिनीवरील मालिकेने नुकताच १३०० भागांचा टप्पा पार केला. यात ब्रह्मांडनायक ही प्रमुख व्यक्तिरेखा अभिनेता **अक्षय मुडावदकर** यांनी साकारली आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांच्याशी केलेली बातचीत...



**अक्षय जी, साक्षात स्वामी समर्थांची भूमिका करताय... मालिकेबद्दल काय सांगाल?**

हो... अन्याय मोडीत काढत आणि मार्गातल्या असंख्य लोकांचा उद्धार करत, त्यांना उपदेश करत स्वामी समर्थ कसे सोलापूर येथील अक्कलकोट येथे पोहचले. त्यांच्या महानतेची प्रचिती लोकांना कशी येत गेली, अक्कलकोट येथील चोळप्पा महाराज, सेवेकरी सुंदराबाई, अक्कलकोटचे राजे मालोजीराव या भक्तांनी स्वामीलीला अनुभवली. ते कसे कृतार्थ झाले, त्यांचे कसे नाते होते आणि या भक्तिमार्गात आणखी कोणकोणती माणसं श्री स्वामी समर्थांच्या कृपाछायेखाली आली हे सगळं या मालिकेत पाहायला मिळत आहे.

**या मालिकेचे नुकतेच १३०० भाग पूर्ण झाले ना.. कसा अनुभव होता?**

होय. या मालिकेने यशाचा एक नवीन विक्रम स्थापित केलाच होता. आता तर या मालिकेने १३०० भागांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार करून प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. स्वामी समर्थांच्या जीवनातील दिव्य कथा, त्यांच्या अलौकिक चमत्कारिक कार्यांचा प्रवास आणि त्यांच्या उपदेशांनी भरलेले अनेक प्रसंग यामुळे ही मालिका महाराष्ट्रातील घराघरात लोकप्रिय झाली आहे.

**१३०० भाग पूर्ण झाल्यावर काय वाटलं?**

खूप म्हणजे खूपच आनंद झाला. सर्वप्रथम या मालिकेशी जोडलेल्या प्रत्येक व्यक्तीचे मी मनापासून आभार मानतो आणि अभिनंदन करतो. कारण आम्ही तब्बल ४ वर्षे मेहनत घेतली आहे. म्हणूनच हा यशस्वी प्रवास पूर्ण झाला आहे. एक टीम म्हणून प्रत्येकाचा यामध्ये मोलाचा वाटा आहे. हे यश संपूर्ण टीमचे आहे. टीमसोबत मी प्रेक्षकांचेही आभार मानतो. कारण त्यांनी पहिल्या भागापासून मालिकेवर, कलाकारांवर भरपूर प्रेम केले. मला खूप छान वाटतेय की, मी अशा एका प्रोजेक्टचा भाग आहे ज्याने एवढा मोठा टप्पा पार केला आहे.

**ब्रह्मांडनायक साकारायची संधी मिळाली त्याबद्दल काय सांगाल?**

हो. नक्कीच... ही गोष्ट प्रत्येकाच्या नशिबात येत नाही. त्यामुळे मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो. ब्रह्मांडनायक साकारण्याची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. या मालिकेद्वारे मी आज घराघरात पोहोचलो. लोकांनी मला भरभरुन प्रेम दिले. आम्ही आता १३०० भागांपर्यंत आलो आहोत स्वामींचा अलौकिक जीवनपट पाहता अजून खूप प्रवास बाकी आहे. स्वामींच्या अनेक अलौकिक लीला पाहायला मिळणार आहेत.

**या मालिकेबद्दल प्रेक्षकांना काय सांगाल?**

स्वामी समर्थांच्या भक्तीतून प्रेरणा घेऊन आम्ही ही मालिका सुरू केली आणि प्रेक्षकांच्या अपार प्रेमाने हा प्रवास यशस्वी झाला आहे. हा टप्पा म्हणजे आमच्या संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा क्षण आहे. प्रेक्षकांना सांगेन की, आमच्यावर असेच प्रेम करत राहा. स्वामी समर्थांच्या आशीवार्दाने आणि प्रेक्षकांच्या प्रेमाने ही मालिका आणखी दीर्घकाळ प्रेक्षकांचे मनोरंजन करत राहील असा मला विश्वास आहे.

हेल्दी Me

# चिकुनगुनिया नंतरचा संधिवात

## (Post-viral arthritis)

**चिकुनगुनिया दरम्यान सांधेदुखी ही एक सामान्य समस्या आहे आणि त्यावर योग्य पद्धतीने उपचार केल्यास सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. या लेखात आपण चिकुनगुनिया विषाणूमुळे होणारे सांधेदुखी आणि त्यावरील उपचार याबद्दल चर्चा करणार आहोत.....**

चिकुनगुनिया हा एक विषाणूजन्य रोग आहे जो डासांच्या चाव्याद्वारे पसरतो, जो हाताळणे खूप कठीण असते. हे इतके प्राणघातक नसले तरी सांधेदुखी, सर्दी, ताप यासारखी लक्षणे दीर्घकाळ टिकू शकतात. लक्षणे ४ दिवसांनंतर दिसू लागतात आणि १२ दिवस टिकतात. त्यामुळे या समस्येचे लवकरात लवकर निदान होणे गरजेचे आहे. निदान झाले की लगेच उपचार सुरू केले पाहिजेत. चिकुनगुनियावर कोणताही इलाज नसला तरी, लक्षणांवर योग्य वेळी उपचार केल्यास दीर्घकाळ आराम मिळू शकतो. चिकुनगुनिया दरम्यान सांधेदुखी ही एक सामान्य समस्या आहे आणि त्यावर योग्य पद्धतीने उपचार केल्यास सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. जर तुम्ही नुकतेच चिकुनगुनिया तापातून बरे झाले असाल परंतु तुमच्या सांध्यांमध्ये सतत दुखत असेल तर ते चिकुनगुनिया संधिवात असू शकते. याला पोस्ट व्हायरल आर्थ्रोपॅथी असेही म्हणतात.




### चिकुनगुनिया तापाचे नंतरचे परिणाम

**१. सांधेदुखी (सर्वात सामान्य) - अनेक आठवडे टिकू शकते.**
**२. अशक्तपणा**
**३. सुस्ती आणि थकवा.**

### सांधे का दुखतात?

व्हाईट स्ट्रिप्ड एडिस इजिप्ती डासाच्या लहानशा चाव्याचे परिणाम दुर्बल होतात आणि रुग्णाला कित्येक आठवडे अंथरुणावर ठेवू शकतात. काही रुग्णांना सकाळी उठणे, मोबाईल फोन उचलण्यासाठी हात उचलणे किंवा लघवी करण्यासाठी उठणे ही सर्व कामे करणे कठीण होऊन बसते.

सांध्यातील वेदना हा विषाणूजन्य संसर्गाच्या शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीच्या प्रति-हल्ल्याचा परिणाम आहे. विशिष्ट विषाणू किंवा इतर कोणत्याही रोगास कारणीभूत असलेल्या जीवांच्या संपर्कात आल्यावर शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय होते. रोगप्रतिकारक यंत्रणा शरीराच्या स्वत:च्या पेशींना संसर्गजन्य घटक म्हणून ओळखते आणि म्हणून ती चिकुनगुनिया विषाणूसह शरीराच्या काही पेशींवर हल्ला करू लागते. यामुळे ऊतींना जळजळ होते आणि शरीराच्या पेशींचे नुकसान होते. जेव्हा ही क्रिया स्नायू आणि सांध्यामध्ये होते तेव्हा स्नायू आणि सांधे दुखू लागतात. चिकुनगुनियामुळे सर्वाधिक सामान्य सांधे प्रभावित होतात ते म्हणजे हातांचे सांधे. मनगट आणि कोपर. घोटा, पाय आणि काही प्रमाणात नितंब यांच्या सांध्यावरही परिणाम होतो. यामध्ये प्रचंड वेदना होण्याव्यतिरिक्त, गुडघ्याचे सांधे, कोपर किंवा मनगट लॉक होऊ शकतात. विषाणूच्या हल्ल्याने सक्रिय झालेल्या अँटीबॉडीज अनेकदा सांध्यातील कूर्चाला धक्का देतात. यामुळे सांध्यांमध्ये सूज येते, अनेकदा हालचालींवर मर्यादा येतात.

कारणीभूत असलेले विषाणू कोपर, मनगट, गुडघा आणि घोट्यासारख्या प्रमुख सांध्यांमध्ये राहतात. ते विष तयार करतात आणि रोगप्रतिकारक यंत्रणेवर परिणाम करतात, ज्यामुळे तापासह स्नायू आणि सांधेदुखी होते. कुर्चे देखील प्रभावित होतात आणि सांधे जळजळतात होतात. सामान्यत: हे संक्रमणानंतर काही दिवस किंवा आठवडे घडते. संधिवात विकसित होईपर्यंत, व्हायरस यापुढे शरीरात उपस्थित नसतो.

(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)



### वेदनांपासून पूर्ण आराम मिळण्यासाठी किती वेळ लागतो?

चिकुनगुनियानंतरची सांधेदुखी तीन महिन्यांपर्यंत टिकू शकते, काही प्रकरणांमध्ये वर्षभरात. वेदना हाताळण्यासाठी आणि पुनर्प्राप्ती कालावधी कमी करण्यासाठी औषधे प्रभावी आहेत. शरीर जितके निरोगी असेल तितके दुर्बलता कमी होईल जेणेकरून निरोगी आहाराच्या सवयी आणि निरोगी जीवनशैली असलेले लोक सहसा इतरांपेक्षा लवकर बरे होतात. शरीराच्या संसर्गासाठी ओव्हर-द-काउंटर औषधे दिली जातात, परंतु चिकुनगुनिया सांधेदुखीचा आयुर्वेदिक उपचार प्रभावी असतो.

### हॉट पॅक

सांधेदुखीपासून त्वरित मदतीसाठी, गरम वाळूचे फोमेंटेशन करा. कढईवर वाळू घ्या आणि ओव्हनमध्ये गरम करा. नंतर, त्या वेळी, जाड फॅब्रिकमध्ये गरम वाळू झाकून घ्या आणि प्रभावित सांध्यावर लावा, ते जास्त गरम होण्यापासून दूर राहण्यासाठी हलवत रहा. या वाळूच्या पोटली स्वेदनाने सांधे दुखणे आणि घट्टपणा लगेच कमी होतो. हे दररोज १० ते १५ मिनिटे करा.

### तुळशीची पाने

तुळस शरीराचे तापमान कमी करण्यास मदत करते. त्यात अँटी-ऑक्सिडंट असतात जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि लवकर बरे होण्यास मदत करतात. तुम्ही दिवसातून एक किंवा दोनदा तुळशीची पाने चावू शकता किंवा तुळशीची काही पाने पाण्यात उकळून प्यावीत.

### पंचकर्म थेरपी

पंचकर्म एक आयुर्वेदिक डिटॉक्सिफिकेशन थेरपी आहे आणि चिकुनगुनिया संधिवात व्यवस्थापित करण्यासाठी खूप प्रभावी आहे. त्यात विशेष औषधी तेलांद्वारे मसाज समाविष्ट आहे. यामुळे सांधेदुखीत लवकर सुधारणा होते.

### तेलाने मसाज

चिकुनगुनियाच्या सांधेदुखीवर शरीराच्या संवेदनशील भागांवर तिळाचे शुद्ध तेल किंवा शुद्ध खोबरेल तेलाने मसाज करणे हा आणखी एक प्रभावी उपचार आहे. मसाज केल्याने शरीरात रक्ताभिसरण वाढते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. औषधी तेलाने मसाज केल्यास स्नायू बळकट होण्यास मदत होते आणि तीव्र वेदनांमध्ये आराम मिळतो.

### शेक घ्या

बहुतेक तज्ज्ञ सांधेदुखी आणि शरीरातील कोणत्याही जळजळीसाठी थंड किंवा बर्फाचा पॅक सुचवतात. कोणत्याही औषधाच्या दुकानात बर्फाचे पॅक प्रभावीपणे उपलब्ध आहेत; तथापि, त्याशिवाय, टॉवेलमध्ये ठेचलेला बर्फ देखील वापरला जाऊ शकतो. सांधेदुखी टिकेपर्यंत हा उपचार दिवसातून काही वेळा शक्य असावा.

### सूर्यफुलाच्या बिया आणि मध

चूर्ण केलेले सूर्यफुलाच्या बिया आणि मध यांचे मिश्रण हे एक उत्तम मिश्रण आहे जे सांधेदुखीपासून मुक्त होण्यास मदत करते. सूर्यफुलाच्या बियांमध्ये झिंक आणि व्हिटॅमिन ई भरपूर असतात जे रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक असतात. दुसरीकडे, मध त्याच्या दाहक-विरोधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे.

### लसूण

लसणाचे शांत करणारे गुणधर्म सांधेदुखीपासून मुक्ती देतात, जे चिकुनगुनियाबरोबर जातात. अशा प्रकारे,



चिकनगुनियाच्या घरगुती उपचारांसाठी, लसणाच्या कापलेल्या काही पाकळ्या ठेचून बनवलेली पेस्ट दिवसातून दोनदा सांध्यांना लावता येते.

### वेदनाशामक औषधे

कोणतेही औषध घेण्यापूर्वी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या. डॉक्टर तुम्हाला योग्य पेनकिलर लिहून देऊ शकतात. वेदनाशामक औषधांचा अतिवापर आणि दीर्घकालीन वापर टाळा कारण त्यांचा तुमच्या मूत्रपिंड आणि यकृतावर वाईट परिणाम होऊ शकतो. चिकुनगुनियानंतरचा संधिवात योग्य जीवनशैली आणि औषधोपचार यांनी बरा होऊ शकतो. रुग्णांनी पॉझिटिव्ह दृष्टिकोन ठेवून घाबरून न जाता या दुखण्यावर मात करावी.

### हळद

हळद हा एक अद्भुत मसाला आहे जो सर्दी-खोकल्यापासून ताप आणि चिडचिड अशा विविध आजारांना दूर करू शकतो. दिवसातून दोनदा कोमट हळदीचे दूध प्यायल्याने सूज कमी होते आणि वेदनाशामक म्हणून जाते.


### नारळ पाणी



नारळाचे पाणी यकृत डिटॉक्सिफाय करण्यासारख्या काही भिन्न फायद्यांसोबत कमी करणारे फायदे देखील भरलेले आहे. दिवसभरात तीन ते चार ग्लास ताजे नारळाचे पाणी प्यायल्यास एकंदरीत आरोग्य सुधारते.


### सौम्य व्यायाम

सांधे वारंवार हलवले नाहीत तर वेदना वाढतात. हेच कारण आहे की सकाळी वेदना आणि कडकपणा जास्त असतो कारण रात्रीच्या वेळी सांधे फारच कमी हलतात.
सकाळी, आपले सर्व सांधे कमीत कमी दोनदा हळूहळू हलवा.
खुर्चीवर बसा आणि पाय वाढवा.
उभे राहा आणि आपले पाय वर करा.
उभे राहा आणि तुमचे शरीर एक एक करून दोन्ही दिशांना फिरवा.
जड वजन उचलणे टाळा.
जड व्यायाम करू नका.



- संकलन - अश्विनी मेढी-घाटपांडे

# नवाकाळ शब्दकोडे-१०७२



**आडवे शब्द –**

३. सगेसोयरे ५. पार्वती ९. उपाय, इलाज, बरोबरी ११. कृष्णा-कोयना नद्यांचा संगम १२. पिवळ्या सालीचे स्वस्त पौष्टिक फळ १३. चाप-बाण १५. जेमतेम, बेताचा १८. बियाणे १९. ओझे २०. सूर्यमालेतील सगळ्यात मोठा ग्रह २१. अजब, चमत्कारिक २२. गोल व आकर्षक नेत्र २४. भुतांचा राजा २५. बाहेरचा २६. बेडूक २८. कमी दर्जाचा २९. चव ३०. न्याहारीतला झटपट पदार्थ ३२. हनुमानाचे वडील ३४. वटवट ३५. चरबी ३७. सडेतोड ३८. अतिशय आळशी माणूस ४०. बुंदीच्या लाडवाचा प्रकार ४१. ठार करणे ४३. मृत्तिका ४४. धूम्रपानाचे जुने साधन ४६. पलंग ४८. चार वेदांपैकी एक ४९. गुलामी ५०. छंद, आवाज ५१. श्वापदाचे पंजे ५२. खाणीत मिळणारे केरोसिन-पेट्रोलचे पूर्वरूप ५३. कंबरेला खोचण्याजोगा पैशांचा बटवा, लांब व अरुंद पिशवी ५५. दुग्धजन्य गोड पदार्थ ५६. मानसन्मान ५८. वशिला ५९. पोळीचा तळलेला पर्याय ६१. चांदी, रजत ६२. प्रवासातील अंश ६३. वरी-नाचणीसारखी हलकी तृणधान्ये ६५. समय ६६. गुपित ६८. नाशवंत ७०. दरसाल नियमित मिळणारी पेन्शनसारखी रक्कम ७२. अस्वस्थ, व्याकूळ ७४. समुद्राच्या पोटातील अग्नी ७७. निर्विवाद ७९. सत्य, सत्याचा अंश ८१. निर्झर ८२. शेकडा प्रमाण ८३. अंगावर काटे असलेला प्राणी, साळींदर ८४. वनात वावरणारा ८६. याग ८७. संधी ८८. एक ज्वालाग्राही पदार्थ ९०. शल्य ९१. मोत्यांचा घेरा असलेली नथ ९३. प्रथा ९४. भूतपूर्व ९५. शिशुवर्ग, पहिलीच्या आधीचा वर्ग ९७. मला (कवितेतला शब्द) ९८. जाड दोर, सुंभ ९९. आपलेपणा, आस्था १००. काटकी १०१. नाराजी

**उभे शब्द –**

१. नावड २. प्रसंगाला साजेसे ३. गायीचे शेण ४. नव्या पालवीचा ऋतू ५. मनात आलेला संशय ६. संन्यासी ७. शांतता ८. वांती १०. शंकराचे वाद्य १४. स्त्रियांचे नेत्रांजन १६. आश्रय १७. दिमाख, शान २०. गुपित २१. मनोरंजन २३. उथळ, लहान मुलांप्रमाणे २४. पृथ्वी २५. बदफैली २७. दयनीय ३०. प्रमुख ख्रिस्ती धर्मगुरू ३१. प्रतिपक्षाचा मुद्दा खोडून काढणे ३२. महाभारतात जरासंधाची राजधानी ३३. मुनी ३६. श्रीलंकेच निसर्गसौंदर्य सांगणारे वर्णन ३८. ठोसा ३९. वात्रट ४०. मौक्तिक ४२. प्रभाव, सत्ता ४३. धुंदी आणणारे ४४. क्षुद्र रकमेची लाच ४५. बंदी ४६. एक चपळ प्राणी, चानी ४७. अप्रिय चव ४८. मैत्रीण ५१. पुष्कळ ५२. निर्दय ५४. निरागस ५६. गुपित ५७. घरामागचे आवार ५९. मायेचा उमाळा ६०. एक धातू, ब्राँझ ६१. नरकातील एक विभाग ६३. वृष्टी ६४. दयाळू ६६. सूर्य ६७. प्रसन्न, हसरा ६९. आश्रयाची जागा ७१. अतिशय जास्त ७३. शर्करा ७५. ग्रोसचा बारावा भाग ७६. वरवरचा, कृतक ७८. गवताची काडी ८०. मार्शल आर्ट्चा एक पौर्वात्य प्रकार ८३. टरफलासहित तांदूळ ८५. अस्थिर, हलवता येण्याजोगे ८७. किंमत ८८. कमळ, मुलांचे एक नाव ८९. कुबेराची राजधानी ९१. वाकून केलेला नमस्कार ९२. उचित, योग्य ९३. बूज, पत्रास ९४. हार, माला ९६. छोटी वस्ती ९७. मनाचा ग्रह, अभिप्राय

**नवाकाळ कोडे क्रमांक १०७१ चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. मधुमास ५. सावकाश ८. सांज ११. घरधनी १२. ताव १४. नल १५. बोजा १६. देशभक्त १७. विवशता १९. गणंग २०. प्रहर २१. माशी शिंकणे २३. रेवती २५. दाभण २७. मदत २९. द्रुत ३०. दल ३१. हातोटी ३३. रवका ३५. बख्खळ ३६. कोरड ३७. मत्स्यगंधा ३९. लागवड ४२. दरी ४३. कीलक ४५. डेवगा ४८. सनद ५०. गावकरी ५२. यक्षकर्दम ५३. दशानन ५६. दगावणे ५८. ताक ५९. लव ६०. वन्ही ६१. बाड ६२. प्रवचन ६५. खाणे ६६. कथिल ६८. राजस ६९. नतद्रष्ट ७१. गंजी ७२. सकाम ७४. बडवा ७६. वितरक ७९. खुलासा ८१. रवासुदगी ८२. अक्रोड ८४. कळ ८५. पारोशी ८६. वज्र ८७. सावध ८८. मराळ ८९. नेताजी ९२. औषध ९५. पळ ९६. मोर ९७. बेमुदत ९८अ. बलोपासना १०१. पक्ष १०२. प्रकाश १०४. दारा १०५. दंडक १०६. घसट १०७. माथा १०८. तनय १०९. कोडगा ११०. लंगर

**उभे शब्द** : १. उघड २. मधमाशी ३. धुनी ४.सतावणे ६. वन ७. कालगती ८. सांजा ९. बेशरम १०. रक्तपात १३. वश १५. बोगदा १६. देह १७. विकल १८. तारे तोडणे २०. प्रणव २१. मातबरी २२. शिंदळकी २४. वटी २६. भरधाव २८. दबाव ३१. हार ३२. मत्स्य ३४. काला ३६. कोकनद ३७. मज्जाव ३८. गंडेरी ४०. गजकर्ण ४१. डगमगणे ४२. दलदल ४४. लस ४६. गायक ४७. धन ४९. दगाबाज ५०. गाणे ५१. कणव ५४. शावक ५५. नवल ५७. वडस ५८. तान ६२. प्रतिकार ६३. चर्म ६४. फतवा ६५. खाष्ट ६७. थिल्लर ६८. राजाखुशीने ६९. नडगी ७०. नाविक ७३. मवाळ ७४. बदमाष ७५. गुंड ७७. तळमळ ७८. कपाळमोक्ष ८०. सावजी ८२. अवकृपा ८३. क्रोध ९०. तारका ९१. समुदाय ९२. औत ९३. धबडगा ९४. हीना ९५. परीघ ९८. दरा ९९. लोक १००. सलग १०१. पट १०२. प्रथा १०३. शत १०५. दंड

# कन्नमवार नगरमध्ये पुनर्विकास रखडला

पान १ वरून

बफर झोनमुळे पुनर्विकासाला परवानगी मिळण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे या इमारतीमधील रहिवाशांनी न्यायालयात दाद मागितली आहे.

या इमारतीतील रहिवाशांचे असे म्हणणे आहे की, या १९६८ पासूनच्या अधिकृत इमारती आहेत. सीआरझेडचा कायदा १९९१ साली आला आहे. ५० मीटर कांदळवन बफर झोनची अधिसूचनाही २०१५ निघाली आहे. या इमारती मागून महानगरपालिकेचा नाला वाहत आहे. या नाल्याच्या दोन्ही बाजूंना संरक्षक भिंत आहे. ती काही ठिकाणी एकाच बाजूला आहे, तर पलीकडील ती अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे नाल्यात काही तुरळक प्रमाणात कांदळवनाची वाढ झाली आहे. या इमारतीपासून पर्यावरणाला कसलाही धोका पोहोचलेला नाही. कांदळवनाचे एकही पान तुटलेले नाही आणि पुनर्विकासामुळे तुटणारही नाही. हे कांदळवन खासगी जागेत आहेत. तशीच त्याची नोंद असून बफर झोनची गरज नाही, असे अधिसूचनेत म्हटले आहे. २०१९ मध्ये जनसुनावणी घेण्यात आली होती. तेव्हा आम्ही आमच्या हरकती मांडल्या होत्या. म्हाडाकडून या हरकती नोंदवण्यात आल्या होत्या. त्यावेळी अधिकाऱ्यांनी म्हाडाला अशा पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे रिपोर्ट सादर करायला सांगितले होते. इथे सॅटेलाईट मॅपिंग करून बफर झोन लावला आहे, परंतु फिजिकल सर्व्हे करून नाला, भिंत, तसेच इमारतीपासून दूरवर असलेले मूळ जंगल ह्या सर्व गोष्टींची खातरजमा करावी. प्रत्येक इमारतींचा वैयक्तिक विचार करावा, अशी रहिवाशांची विनंती आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश मोहित शहा यांनी २९ जुलै २०१५ रोजी एक आदेश पारित करून असे स्पष्ट म्हटले होते की, ६ जानेवारी २०११ च्या सीआरझेड अधिसूचनेवर आम्ही मांडलेल्या व्याख्येनुसार, जिथे जमिनीचा भूखंड ५० मीटर बफर झोनमध्ये येतो, परंतु तो ६ जानेवारी आधीच मंजूर केलेला असेल किंवा महापालिका क्षेत्रात किंवा विद्यमान कायदेशीररीत्या मंजूर केलेल्या शहरी भागात पायाभूत सुविधेसह ले-आऊट मंजूर असेल, तर तो सीआरझेड-टू असे मानले जाईल. याबाबत मंगळवारी सुनावणी होईल.

# कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडीयुरुप्पांवर कोविड भ्रष्टाचार प्रकरणी खटल्याची शिफारस

पान १ वरून

लाख रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप ठेवण्यात आला असून त्यांच्याकडून ५०० कोटी रुपये वसूल करण्याचीही शिफारस केली आहे.

समितीने कोविड काळातील पीपीई किट खरेदीमध्ये नियमांचे पालन न केल्याचा आरोप ठेवला आहे. हाँगकाँगच्या डीएचबी ग्लोबल व बिग फार्मास्युटिकल्स यांच्याकडून कोणत्याही निविदा न काढता प्रति किट २००० रुपये दराने खरेदी केली होती. कर्नाटक पारदर्शकता नियम १९९९ चे उल्लंघनही करण्यात आले होते. ही खरेदी करतांना सामान्य प्रक्रियाही राबवण्यात आली नाही. त्याचप्रमाणे या दोन्ही कंपन्या मुख्यमंत्र्यांच्या ओळखीच्या होत्या. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. समितीने दिलेल्या शिफारशीत असा प्रश्नही उपस्थित करण्यात आले आहे की, या प्रकारच्या पीपीई किट देशांतर्गत केवळ ४०० ते दीड हजार रुपये किंमतीत मिळत असतांना इतक्या अधिक किंमतीच्या पीपीई किट का विकत घेण्यात आल्या ? या शिफारशींमुळे माजी मुख्यमंत्र्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे सरकारच्या कोविड काळातील खरेदी चौकशी केंद्राकडून करण्यात आली होती. त्या उलट आता थेट भाजपा राज्यातीलच भ्रष्टाचार उघड झाल्यामुळे भाजपाच्याही अडचणी वाढल्या आहेत.

# दिल्लीतील काँग्रेसचे आमदार मतीन अहमद आपमध्ये दाखल

■ नवी दिल्ली

**फेब्रुवारी** महिन्यात होणाऱ्या दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधीच काँग्रेसला मोठा धक्का बसला. दिल्लीत ५ वेळा आमदार राहिलेले काँग्रेसचे मतीन अहमद यांनी आज दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या उपस्थितीत आम आदमी पक्षात प्रवेश केला. मतीन यांच्या पक्षप्रवेशानंतर अरविंद केजरीवाल यांनी विधानसभा निवडणुकीचे तिकीट त्यांच्या कुटुंबीयांसाठी जाहीर केले. मतीन अहमद १९९३ ते २०१५ दरम्यान पाच वेळा सीलमपूर विधानसभा मतदारसंघातून आमदार होते. ते दिल्ली जल बोर्डाचे माजी उपाध्यक्षही होते. शीला दीक्षित मुख्यमंत्री असताना त्यांना दिल्ली वक्फ बोर्डाचे अध्यक्षही करण्यात आले होते.

दिल्लीतील मुस्लिम मतदारांचा प्रभाव असलेल्या दहा विधानसभा मतदारसंघांत त्यांची पकड चांगली मानली जाते. दिवाळीला मतीन अहमद यांचा मुलगा चौधरी झुबेर, काँग्रेसचे बाबरपूर जिल्हाध्यक्ष चौहान बांगर, काँग्रेस नगरसेवक शगुफ्ता चौधरी यांनी आम आदमी पक्षात प्रवेश केला होता.

# मी संधीसाधू तर पवार कोण? अशोक चव्हाणांचे प्रत्युत्तर

■ नांदेड

**भाजपा** खासदार अशोक चव्हाण यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले. त्यांनी मविआवरही टीका केली आहे. ते म्हणाले की, मी संधीसाधू तर पवार कोण?

चव्हाण कुटुंबीयांना काँग्रेसने मुख्यमंत्रीपद, देशाचे गृहमंत्रिपद, अर्थमंत्रिपद, संरक्षणमंत्रिपद दिले. स्वतः अशोक चव्हाण यांना मुख्यमंत्रिपद दिले, अजून काय द्यायचे होते? अशोक चव्हाण हे संधीसाधू आहेत, अशी टीका शरद पवारांनी केली होती. याबद्दल अशोक चव्हाण म्हणाले की, शरद पवार नेमके काय म्हणाले हे मला माहीत नाही, पण शरद पवार खूप ज्येष्ठ नेते आहेत. त्यांनी माझ्यासारख्या लहान माणसावर वक्तव्य केले असेल असे मला वाटत नाही. मी जर संधीसाधू आहे, तर मग शरद पवार काय आहेत? या प्रश्नाचे उत्तरसुद्धा पवार यांना द्यावे लागेल.

शरद पवार यांनी अब्दुल सत्तार यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये ताळमेळ राहिलेला नाही, मविआचा नुसता गोंधळ सुरू आहे. हा असाच गोंधळ राज्यपातळीवर झाला तर, आपण राज्याचा काय विचार करणार?

# कामगारांच्या कमतरतेमुळे राममंदिर पूर्ण होण्यास तीन महिने विलंब

पान १ वरून

आणण्यात आला असून तो तयार आहे. मात्र त्याचा वापर करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही. पहिल्या मजल्यावर बसवण्यात आलेले काही दगड हे कमकुवत असून ते पातळ आहेत. त्यामुळे ते बदलणे आवश्यक आहे. त्या जागी मकराना जातीचा अधिक मजबूत मार्बल लावण्यात येणार आहे. मंदिर परिसरात उभारण्यात येणाऱ्या विविध मूर्ती तयार करण्याचे काम सध्या जयपूर मध्ये सुरु आहे. या मूर्ती पुढच्या महिन्यात अयोध्येत येतील. शिल्पकारांनी या मूर्ती वर्षअखेर पूर्ण होतील असे आश्वासन आम्हाला दिले आहे. सध्या राममंदिर बांधण्याचे काम पूर्णत्वाकडे जात असले तरी त्याला विलंब लागून ते पुढच्या वर्षीच्या सप्टेंबरपर्यंत पूर्ण होईल.

# सरकार बदलल्याशिवाय म्हातारा होणार नाही! शरद पवारांचे वक्तव्य

पान १ वरून

लोकांनी आमची साथ सोडली आणि भाजपाच्या पंक्तीत गेले. आधी सांगत होते विकासासाठी गेलो आहोत. मात्र आता भुजबळ नावाचे मंत्री आहेत ते सांगत आहेत, ईडीच्या भीतीने, मला तुरुंगात टाकले होते म्हणून आम्ही भाजपासोबत गेलो. एक प्रकारे लाचारीचे दर्शन घडले आहे. महाराष्ट्र स्वाभिमानी आहे. त्यासाठी तुमची साथ हवी आहे. पुढे भाजपावर निशाणा साधताना शरद पवार म्हणाले की, संविधान बदलण्यासाठी ४०० पारची घोषणा केली होती. मात्र तुम्ही लोकांनी निर्णय हाती घेतला. एकत्र येऊन महाराष्ट्रातील ४८ खासदारांपैकी आमचे ३१ खासदार तुम्ही निवडून दिले आणि घटना वाचवायचे काम केले. त्यामुळे आता ही विधानसभा तुमच्या विचाराच्या लोकांच्या हातात पाहिजे. कारण सत्ता हातात आल्यावर लोकांचे प्रश्न सोडवता येतात. माझा बळीराजा सुखी झाला पाहिजे, त्याच्या घरातील मुले उच्चशिक्षित झाली पाहिजेत. त्यासाठी आम्ही काम हातात घेतले आहे. महाविकास आघाडीचे संघटन उभे केल आहे. महिलांना अधिकार दिले की त्या काहीही करू शकतात. महिलांना संधी देण्यासाठी महालक्ष्मी योजना काढली आहे.

# ५०० रुपयांत ६ सिलिंडर! १०० युनिट वीज मोफत

पान १ वरून

के. सी. वेणुगोपाल, काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अविनाश पांडे, खासदार अभिषेक मनु सिंघवी, प्रमुख प्रवक्ते प्रवन खेरा, खासदार वर्षा गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, शिवसेनेचे खासदार संजय राऊत, अरविंद सावंत उपस्थित होते.

मविआने काही दिवसांपूर्वी जाहीर केलेल्या पंचसूत्रीतील महिलांना दर महिन्याला ३ हजार रुपये आणि महिला व मुलींसाठी मोफत बस सेवा, शेतकऱ्यांचे ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन, बेरोजगार तरुणांना दर महिन्याला ४ हजार रुपयांपर्यंतची मदत, प्रत्येक कुटुंबाला २५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा, जातनिहाय जनगणना आणि आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवणार या पाच गॅरेंटीचा महाराष्ट्रनाम्यातही समावेश आहे. याशिवाय मविआ सत्तेत आल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत काय कामे करणावर व पाच वर्षांत काय काम करणार हे या जाहीरनाम्यात सविस्तर मांडण्यात आले आहे.

महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी शक्ती कायदा, नवीन औद्योगिक धोरणात रोजगार निर्मितीवर भर , एमपीएसीचे वेळापत्रक जाहीर करून ४५ दिवसांत निकाल, सरकारी नोकऱ्यातील कंत्राटी भरती पद्धत बंद करणार, सरकारी विभागातील जागांचा अनुशेष भरणार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेळापत्रक ठरवून निवडणुका घेणार,

नवे औद्योगिक धोरण आखणार, महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देणार, राज्यात सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणार, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा, मुलांना सुविधा देण्यासाठी आढावा घेऊन लागू योजनांमध्ये सुधारणा करणार, सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणार, वृद्ध कलावंतांचे मानधन वाढविणा, शिवभोजन थाळी योजना केंद्रांची संख्या वाढविणार, रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करणार, या निवडणुका एकसदस्यीय प्रभाग पद्धतीने घेणार, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच आणि उपसरपंच यांचे थकित मानधन व भत्ता देणार, जगभरातील मराठी आणि महाराष्ट्रातील परभाषिकांना मराठी भाषा शिकविण्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन अभ्यासक्रम सुरू करणार, महायुतीने रखडविलेल्या चैत्यभूमी, दादर (इंदू मिल) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकांचे काम निश्चित मुदतीत करण्यासाठी कृती आराखडा करणार, महायुती सरकारने खासगी संस्था व व्यक्तींना भूखंड देण्याबाबत काढलेल्या आदेशांचा फेरविचार करणार, क्रांतिसूर्य महात्मा फुले, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना 'भारतरत्न' प्रदान करण्याची आग्रही मागणी केंद्र सरकारकडे करणार, महायुती सरकारने पक्षपाती भूमिकेतून काढलेल्या अध्यादेशांचा फेरविचार करणार, महिलांसाठी 'शक्ती' कायद्याची कठोर अंमलबजावणी करणार, महिलांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि हाकेच्या अंतरावर सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारणार, आरोग्य, शेतकऱ्यांचे संरक्षण आणि हवामानबदलाचे संकट पेलण्यासाठी 'महाराष्ट्र मिलेट मिशन' राबवविणार, दूध उत्पादकांचा खर्च लक्षात घेऊन दरवर्षी दूध दर निश्चित करणार, कांदा आणि टोमॅटोला संरक्षण देत राज्यात गुलाबी आणि शेंदरी क्रांती आणणार, महाराष्ट्रासाठी नवे शैक्षणिक धोरण आणणार, पाच वर्षांत साडेबारा लाख बेरोजगारांना रोजगार देणार, पाच वर्षांत साडेबारा लाख बेरोजगारांना रोजगार देणार, पेपर फुटीविरोधातील कायदा आणखी कडक करणार अशीही अनेक वचने या जाहीरनाम्यात मविआने दिली आहेत.

महाराष्ट्रनाम्याच्या प्रकाशनावेळी बोलताना काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, महाराष्ट्राची निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यावेळी म्हणाले की, भाजपा युती सरकारला दीड वर्षात शेतकऱ्यांची आठवण आली नाही, पण आता त्यांना शेतकऱ्यांची आठवण आली असून कर्जमाफी करण्याच्या वल्गना करु लागले आहेत. महागाई, बेरोजगारी, महिला, शेतकरी दिसले नाहीत. आता त्यांना पराभव दिसत असल्याने यांची आठवण झाली आहे. आता भाजपा युती सरकार खाली खेचण्याची वेळ आली असून महाराष्ट्रातील स्वाभिमानी जनतेने परिवर्तन करण्याचे ठरवले आहे. तर शिवसेना खासदार संजय राऊत यावेळी म्हणाले की, महाराष्ट्र कधी कोणाचा गुलाम बनला नाही व बनणार नाही. हा जाहीरनामा महाराष्ट्राचा स्वाभिमान दाखवणारा आहे.

## मोदींनी पुन्हा शाळेत जावे रेड बुकवरून खरगेंचा टोला



मोदींना टोलाराहुल गांधी यांनी संविधानाचे लाल रंगाचे पुस्तक दाखवल्यावर पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस शहरी नक्षलवादाला प्रोत्साहन देत असल्याची टीका केली आहे. त्याला आज मल्लिकार्जून खरगे यांनी प्रत्युत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना लाल रंगाचे संविधान दिल्याचा फोटो दाखवून खरगे म्हणाले की, त्यांनी हे पुस्तक दिले तर संविधान, आणि आम्ही हे केले तर शहरी नक्षलवाद कसा? पंतप्रधान मोदींनी पुन्हा प्राथमिक शाळेत जाणे आवश्यक आहे.

# प्रयागराजमधील कुंभमेळ्यामुळे हॉटेलचे दर गगनाला भिडले

■ प्रयागराज

**प्रयागराजमध्ये** येत्या जानेवारी महिन्यात महाकुंभमेळा होणार असून प्रयागराजमध्ये राहण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. येथील हॉटेलचे दर गगनाला भिडले आहेत. दिवसाचे एक हजार रुपये भाडे असलेल्या हॉटेलची रुमचे भाडे या काळात पाच हजारांवर गेली आहे. प्रयागराजमध्ये एका बाजूला महाकुंभाची तयारी सुरु असतानाच दुसरीकडे राहण्याचा प्रश्न मोठा आहे. काही चांगल्या हॉटेलमधील ज्या खोल्या ७ ते ८ हजार रुपयांना मिळतात त्यांचे दर आता ४० ते ४५ हजार रुपयांवर गेले असून यामुळे महाकुंभ काळात मोठा गोंधळ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

२९ जानेवारी रोजी होणाऱ्या सर्वात मोठ्या शाही स्नानाच्या दिवसासाठी हे सर्वाधिक दर असून इतर दिवशी ते काहीसे स्वस्त आहेत. प्रयागराजमधील तारांकित हॉटेलमधील खोल्या बहुतांश परदेशी पर्यटकांनीच आरक्षित केल्या असून धर्मशाळा, यात्रीनिवास व इतर राहण्याच्या ठिकाणीही मोठी गर्दी आहे. प्रयागराजमध्ये २१८ हॉटेल असून त्यातील १३३ नोंदणीकृत आहेत.

